७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. ०४ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०४१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## अमराठी बिल्डरची मराठी तरुणाला मारहाण

मुंबई (दै. संध्या) : सुशील रहेजा नामक एका मुंबईतील बांधकाम व्यावसायिकाने मराठी तरुणाला मारहाण व शिवीगाळ केल्याची घटना समोर आली आहे. मनसेने या प्रकरणी तीव्र संताप व्यक्त करत आपल्या पद्धतीने न्याय करण्याचा इशारा दिला आहे. केंद्र राज्य व आता मुंबईतही भाजपची सत्ता आल्यामुळे रहेजा नामक बेडकांची डराव - डराव वाढली आहे, असे मनसेने म्हटले आहे. भाजपने मुंबई लगतच्या मीरा-भाईंदर महापालिकेच्या महापौरपदी एका अमराठी व्यक्तीची निवड केली आहे. मराठी एकीकरण समितीने या प्रकरणी रान पेटवले आहे. हा वाद टोकाला भिडला असतानाच आता मुंबईतील एका अमराठी बिल्डरने मराठी तरुणाला 'तुम घाटी के लोग कभी सुधरोगे नहीं' असे म्हणत मारहाण केल्याची घटना उजेडात आली आहे. यामुळे एकच खळबळ माजली आहे. मनसेचे नवी मुंबई अध्यक्ष गजानन काळे यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणी त्यांनी सत्ताधारी भाजपवर शरसंधान साधत निर्वाणीचा इशारा दिला आहे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

#### अपहरण करुन लुबाडणारी टोळी जेरबंद

पुणे (दै. संध्या) : पुणे स्टेशनला जाण्यासाठी शात्रीनगर चौकात थांबलेल्या तरुणाला लिफ्ट देण्याचा बहाणा करुन त्याचे चौघांनी अपहरण केले त्याला मारहाण करुन लुबाडणाऱ्या टोळीला गुन्हे शाखेच्या युनिट ४ च्या पथकाने अटक केली आहे. राहुल किसन सावंत (वय १९, रा. समर्थनगर, खराडी, मुळ रा. आंबेजोगाई, जि. बीड), निशांत झुंबर बागुल (वय २१, रा. चिखलठाण, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर), महेश रामकिशन सोनटक्के (वय २०, रा. खांदवेनगर, गीताई पार्क,लोहगाव) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून फिर्यादीचा चोरलेला मोबाईल, त्यांचे ३ मोबाईल तसेच गुन्हा करण्यासाठी वापरलेली स्विफ्ट डिझायर कार व लोखंडी कोयता असा एकूण ७ लाख ४१ हजार रुपयांचा माल जप्त केला आहे. त्यांचा एक साथीदार फरार आहे.

#### दुकान मालकाला पोलिसांनी केली अटक

पुणे (दै. संध्या) : गेली ५ वर्षे काम करणाऱ्या सोने कारागीराने २०२४ पासूनची जमा झालेली मजुरी व सोने मागितल्याने त्याला दुकानदाराने डांबुन ठेवल्याचा प्रकार समोर आला आहे. फरासखाना पोलिसांनी या दुकानमालकाला अटक केली आहे. सुखदेव दास (वय ३८, रा. विटेकर बिल्डिंग, गणेश पेठ) असे अटक केलेल्या दुकान मालकाचे नाव आहे. याबाबत कारागीर अरिफ नासिम मंडळ (वय २७, रा. विटेकर बिल्डिंग, गणेश पेठ) यांनी फरासखाना पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. हा प्रकार २०२१ पासून आतापर्यंत गणेश पेठेतील विटेकर बिल्डिंग येथे घडला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अरिफ मंडल हा गंठण बनविणारा कारागीर आहे. तो सुखदेव दास याच्याकडे २०२१ पासून काम करतो. २०२४ मध्ये फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ यांनी सुखदेव दास यांना खात्यावरील कामाचे सोने व पगार मागितला. तेव्हा दास याने उलट फिर्यादी व त्यांचा भाऊ या दोघांवरच २५५ ग्रॅम सोने कामाच्या सोन्यातून चोरल्याचा आरोप लावून त्यांना शिवीगाळ करुन मारहाण केली. जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादीच्या आईवडिलांना देखील धमकी दिली.

# पुरंदर विमानतळाची निर्मिती करण्यात येणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : पुरंदर विमानतळ विकास कामांचा आढावा

**मुंबई (दै. संध्या)**

वेगाने होत असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे पुणे शहर व परिसर गुंतवणुकीचे आकर्षण बनले आहे. त्यामुळे पुणे शहर व परिसरात औद्योगिकरण वाढत आहे. नागरीकरणाचा वेगही गतिमान आहे, अशा परिस्थितीत भविष्यातील पुणे शहराची गरज लक्षात घेऊन पुरंदर विमानतळाची निर्मिती करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

विमानतळासाठी भूसंपादन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून कालमर्यादेत पूर्ण करून विमानतळ विकासाचा मोठा टप्पा पार करावा,असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. वर्षा निवासस्थानी पुरंदर विमानतळ विकासकामांचा आढावा घेताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विमानतळ विकासासाठी निधी उपलब्धतेची विशिष्ट पद्धत ठरविण्यात यावी. भूसंपादनाकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कार्यवाही पूर्ण करावी. विमानतळ विकासामध्ये सिडको, नगरविकास विभाग यंत्रणांनी आपली जबाबदारी निश्चित करून भूमिका यशस्वीपणे पार पाडावी. विमानतळ निर्माण झाल्यानंतर हा परिसर 'डेव्हलपमेंट झोन' म्हणून पुढे येणार आहे. त्या अनुषंगाने सिडकोने परिसरात आत्ताच जमीन उपलब्धतेची खात्री करून घ्यावी.

### या गावात भूसंपादनाची प्रक्रिया

पुणे जिल्ह्यातील वनपुरी, कुंभारवळण, उदाची वाडी, एखतपूर, मुंजवडी, खानवडी व पारगाव या सात गावात पुरंदर विमानतळासाठी भूसंपादन करण्यात येत आहे. या गावांमध्ये भूसंपादनासाठी गाव निहाय उपजिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी दर्जाचे भूसंपादन अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

राज्यातील विमानतळाचा विकास करण्याची जबाबदारी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे आहे. कंपनीची क्षमता वृद्धी करून राज्यातील निर्माणाधीन असलेली सर्व विमानतळे विकासाकरिता कंपनीकडे देण्यात यावीत. पुरंदर विमानतळाच्या उर्वरित भूसंपादनाची अधिसूचना 'एमआयडीसी'ने काढावी तसेच निधीची उपलब्धतेबाबत विशिष्ट पद्धत ठरवण्यात यावी. विमानतळ विकासासाठी निधी उपलब्धतेचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीत आणावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

सद्यस्थितीत प्रस्तावित क्षेत्रापैकी १२१६ हेक्टर आर जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण करावी. या संयुक्त मोजणीचा, हरकतींचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, प्रधान सचिव (उद्योग) पी. अन्बळगन, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारसू आदी उपस्थित होते. दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी बैठकीत सहभाग घेतला.

## प्रफुल पटेलांना राष्ट्रवादीचा अध्यक्ष म्हणणे पडले महागात

**मुंबई (दै. संध्या)**

प्रफुल पटेल यांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणणे केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांना चांगलेच महागात पडल्याचे दिसत आहे. विनापरवाना आणि चुकीची माहिती सार्वजनिक केल्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पियुष गोयल यांची कानउघडणी केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे महायुतीमधील मित्रपक्षाच्या अंतर्गत निर्णयांमध्ये भाजप हस्तक्षेप करत असल्याचा चुकीचा संदेश गेल्याने अमित शाह यांनी पियुष गोयल यांच्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या नेतृत्वावरून तर्कवितर्क लढवले जात असताना, पियुष गोयल यांनी एका मुलाखतीत प्रफुल पटेल हे नवे राष्ट्रीय



अध्यक्ष असल्याचे विधान केले होते. सुनेत्रा पवार यांच्याकडे नेतृत्व देण्याची मागणी पक्षांतर्गत होत असताना, भाजपच्या मंत्र्याने नाव जाहीर केल्याने राष्ट्रवादीच्या गोटात अस्वस्थता पसरली होती. सूत्रांच्या माहितीनुसार, अमित शाह यांनी या मुद्द्यावरून गोयलांना फटकारले असून, कोणत्याही अधिकृत निर्णयाशिवाय मित्रपक्षाच्या धोरणात्मक बाबींवर बोलणे टाळण्याचे आदेश दिले आहेत.

## मी राष्ट्रवादीचा अध्यक्ष होणार नाही : प्रफुल्ल पटेल यांची स्पष्टोक्ती

### आज आमच्यापुढे विलीनीकरणाचा कोणताही प्रश्न नसल्याचेही केले स्पष्ट

**मुंबई (दै. संध्या)**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी अजित पवार यांच्या निधनानंतर आपण पक्षाच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत नसल्याचे स्पष्ट केले आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर कोण? काय? कसे? कुठे हे पाहण्याची जबाबदारी माझी आहे. त्यामुळे मी स्वतः राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष होणार नाही हे स्पष्ट आहे, असे ते म्हणालेत. आज आमच्यापुढे विलीनीकरणाचा कोणताही प्रश्न नसल्याचेही त्यांनी यावेळी प्रामुख्याने अधोरेखित केले. त्यामुळे अजित पवारांच्या पश्चात राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांत सुरू असणारी विलीनीकरणाची कथित



चर्चा पुढे सरकणार नसल्याचे हे आता स्पष्ट झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या केंद्रीय कार्यालयात आज अजित पवारांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना प्रफुल्ल पटेल म्हणाले, आम्ही आमच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते, सुनील तटकरे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे आदी नेत्यांशी संवाद साधून आम्ही सुनेत्रा पवार यांच्या घरी गेलो. त्यांची पार्थ व जय पवार ही दोन्ही मुले तिथे होती. आम्ही त्यांचे सांत्वन करत राष्ट्रवादी काँग्रेस खंबीरपणे तुमच्या व तुमच्या कुटुंबाच्या पाठिशी आहे. ही आमची व जनतेचीही भावना आहे की, आपण ही जबाबदारी स्वीकारावी. त्यावर सुनेत्रा पवारांनी आमच्या विनंतीला मान दिला.

सुनेत्राताई मुंबईला आल्या. त्यांनी पवार कुटुंबात 3 दिवसांचा दुखवटा असल्याचे सांगितले. त्यानंतर चौथ्या दिवशी त्या आल्या. त्यानंतर आम्ही त्यांची निवड केली. त्यानंतर त्यांचा शपथविधी झाला. आमच्या अंतर्गत प्रश्नांवर सध्या उलटसुलट चर्चा सुरू आहेत. आम्ही आमच्या पक्षाचे नेते निवडणार की, दुसरा एखादा व्यक्ती निवडणार? आम्ही एक पक्ष आहोत. त्याचे दोन पार्ट आहेत.

## गडकरींना खासगी विमानाने प्रवास टाळण्यास सांगणार

**मुंबई (दै. संध्या)**

■ अनिल देशमुखांचे विधान, अजित पवारांच्या अपघातावरही उपस्थित केले प्रश्न

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भीषण विमान अपघातानंतर राज्याच्या राजकारणात शोककळा पसरली असतानाच, आता बड्या नेत्यांच्या प्रवासातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना एक महत्त्वाचा आणि मित्रत्वाचा सल्ला देणार असल्याचे माजी गृहमंत्री आणि शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी म्हटले आहे. "अजित पवारांचा अपघात हा संशयास्पद असून, नितीन गडकरी यांनी आता छोट्या आणि खासगी विमानाने प्रवास करणे टाळावे. असे सांगणार



आहे." असे अनिल देशमुख म्हणालेत.

अजित पवारांच्या निधनामुळे व्यथित झालेल्या अनिल देशमुखांनी सुरक्षेच्या कारणास्तव नितीन गडकरी यांच्याबद्दल चिंता व्यक्त केली. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, "अजित पवारांचा झालेला अपघात मनाला चटका लावणारा आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे जर मला कधी विमानतळावर भेटले, तर मी त्यांना नक्की सांगेन की, तुम्ही आता छोट्या आणि खासगी विमानाने प्रवास करू नका. अशा विमानांच्या सुरक्षेबाबत आता गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे."

अजित पवारांच्या विमान अपघाताच्या कारणांवर भाष्य करताना अनिल देशमुखांनी प्रशासनाच्या 'धुकं' असल्याच्या दाव्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. बारामती विमानतळावर धुकं असल्याने धावपट्टी दिसली नाही, असे सांगितले जात आहे. मात्र, अपघाताचा जो व्हिडीओ समोर आला आहे, तो खूप लांबून काढलेला आहे.

व्हिडीओमध्ये विमान हवेतच तिरके झाल्याचे दिसते. त्यामुळे केवळ धुक्यामुळे हा अपघात झाला आहे, यावर कोणाचाही विश्वास नाही. जर खरंच तिथे दाट धुकं असतं, तर इतक्या लांबून व्हिडीओ काढणं शक्य होतं का? असा सवाल अनिल देशमुख यांनी उपस्थित केला. या कारणांमुळेच, केवळ डीजीसीएची चौकशी पुरेशी नसून उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समिती नेमून या प्रकरणाचा छडा लावावा, अशी मागणी अनिल देशमुख यांनी केली आहे.

## पटेलांनी घेतली मोदी-शहांची भेट

### दोन्ही नेत्यांसोबत बंद दरवाज्याआड चर्चा

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी आज नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. पटेल यांनी या दोन्ही नेत्यांशी स्वतंत्रपणे बंद दरवाज्याआड चर्चा केली. अजित पवारांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाचा पेचप्रसंग तथा विलीनीकरणाच्या मुद्यावर उलटसुलट चर्चा सुरू असताना प्रफुल्ल पटेल यांनी मोदी व शहांची भेट घेतली आहे. त्यामुळे या भेटीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वेगाने घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गत बुधवारी विमान अपघातामध्ये निधन झाले. तेव्हापासून त्यांच्यानंतर



पक्षाची धुरा कोण सांभाळणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीनंतरही ही चर्चा थांबली नाही. प्रफुल्ल पटेल यांनी आज स्वतः पुढे येऊन आपण अध्यक्षपदाच्या शर्यतीत नसल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर काही वेळातच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची स्वतंत्रपणे भेट घेऊन त्यांच्याशी बंद दरवाज्याआड चर्चा केली. या चर्चेचा तपशील अद्याप बाहेर आला नाही. पण ही चर्चा राष्ट्रवादी काँग्रेसमधील सध्याच्या घटनाक्रमाभोवतीच फिरत होती असे सांगितले जात आहे.


# पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकासासाठी आवश्यक भूसंपादन गतीने पूर्ण करावे : मुख्यमंत्री

## मुख्यमंत्र्यांनी घेतला महत्त्वाच्या भूसंपादन प्रकरणांचा आढावा

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यात पायाभूत सुविधा तसेच औद्योगिक विकासासाठी भूसंपादन प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ही प्रक्रिया गतीने आणि पारदर्शक पद्धतीने राबवावी, प्रकल्पांसाठी जमीन देणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) विविध प्रकल्पांसाठी सुरू असलेल्या भूसंपादनाचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीस उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलरासु, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांच्यासह सर्व संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी (दूरदृश्य प्रणालीद्वारे) उपस्थित होते.

राज्यात औद्योगिक विकासासाठी विविध विभागांमध्ये एकूण ८,९६९ एकर क्षेत्र उपलब्ध असून नव्याने २०,४३१ एकर जमीन ताब्यात घेण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात औद्योगिक गुंतवणुकीसाठी मोठी मागणी येत असून उद्योजकांना लागणाऱ्या जागेचा विचार करुन एमआयडीसीने एक लाख एकर



जागा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवावे. मुंबई-पुणे-नागपूर बरोबरच नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आदी भागांमध्ये गुंतवणूकदारांकडून जमिनीची मागणी वाढत आहे. यादृष्टीने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादनाच्या कामांना गती द्यावी. यासाठी शासन स्तरावरून आवश्यक ते साहाय्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. विविध जिल्ह्यातील 'एमआयडीसी'च्या भूसंपादनाबरोबरच 'एमएसआरडीसी'कडील शक्तिपीठ एक्स्प्रेस वे, विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर, नागपूर-गोंदिया एक्स्प्रेस वे, भंडारा-गडचिरोली एक्स्प्रेस वे, नागपूर चंद्रपूर एक्स्प्रेस वे, नवेगाव-सुरजागड मिनरल कॉरिडॉर, जालना नांदेड एक्स्प्रेस वे आदी प्रकल्पांच्या सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेचाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी आढावा घेतला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात सुरू असलेले सर्व प्रकल्प येत्या तीन वर्षात पूर्ण होतील, असे नियोजन करावे. यासाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती द्यावी. त्याचबरोबर वनक्षेत्र नसलेल्या जास्तीत जास्त सलग जागेचे भूसंपादन करुन ती उद्योजकांना उपलब्ध करुन द्यावीत. याशिवाय, विविध विभागाकडील शासकीय जमिनी औद्योगिक वापरासाठी विनामूल्य हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव सादर करावा, यामुळे उद्योजकांना कमी दरात भूखंड उपलब्ध होऊन राज्यातील औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांनी, कोकणातील भूसंपादन प्रक्रियेदरम्यान कुठेही वन जमिनीचे संपादन केले नसल्याची माहिती दिली.

# संपादकीय

## महाराष्ट्राला लॉटरी

मुंबई, पुणे आणि नागपूर ही महाराष्ट्राची महत्त्वाची शहरे आणि येथेच सर्वाधिक प्रकल्प येत आहेत. त्यामुळे या केंद्रांना आर्थिक मदत दरवर्षी म्हणजे या केंद्रांची उर्जितावस्था आणून महाराष्ट्राला आणखी उंचीवर नेऊन ठेवण्यासारखे आहे. केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला कर विनियोजनातून राज्याला ९८ हजार ३०६ कोटी रुपये मिळतील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, हे यासाठी महत्त्वाचे आहे. कारण आदित्य ठाकरे आणि विरोधी पक्षांनी केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काहीच मिळाले नाही असे रडगाणे लावले. त्याला उत्तर म्हणून फडणवीस यांचे विधान आणि संबंधित आकडेवारी महत्त्वाची आहे. ही रक्कम २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातून मिळणाऱ्या रकमेपेक्षा २० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. तरीही आदित्य ठाकरे म्हणतात त्यामागे केवळ भाजपचा द्वेष आणि स्वतःला सत्ता मिळाली नाही ही खंत आहे, दुसरे काही नाही. महाराष्ट्राला इतकेच नव्हे, तर पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये जे १२.२ लाख कोटी रुपये गुंतवले जाणार आहेत त्यामध्येही महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. मुंबई, पुणे आणि नागपूर येथील प्रस्तावित विकासकेंद्रांना पुढील पाच वर्षांत ५ हजार कोटी रुपये मिळणार. मुंबई, पुणे आणि नागपूर हे महाराष्ट्राची महत्त्वाची शहरे आणि येथेच सर्वाधिक आस्थापना आणि विविध प्रकल्प येत आहेत. त्यामुळे या केंद्रांना आर्थिक मदत दरवर्षी म्हणजे या केंद्रांची उर्जितावस्था आणून महाराष्ट्राला आणखी उंचीवर नेऊन ठेवण्यासारखे आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जे म्हणतात महाराष्ट्राला खूप काही दिले आहे हे सत्य आहे. फडणवीस यानी सांगितले त्याप्रमाणे मुंबई, पुणे आणि हैदराबाद या हायस्पीड कॉरिडॉरमुळे महाराष्ट्राच्या विकासाला तर चालना मिळेलच, पण मराठवाडा आणि इतर जे मागास भाग आहेत त्यांच्या विकासाला हातभार लागणार आहे. हायस्पीड रेल्वेमुळे १७० किमीचा प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत पूर्ण होणार. काँग्रेस नेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी अर्थसंकल्पावर टीका करताना म्हटले, की सुधारणांपेक्षा देखाव्याला प्राधान्य दिले. पण विरोधक म्हणून त्यांची टीकेत काही तथ्य नाही. कारण केंद्राने महाराष्ट्राला आणि देशाला भरपूर काही दिले. महाराष्ट्राला केवळ हायस्पीड रेल्वेच नव्हे, तर अर्थसंकल्पीय तरतुदीमुळेही लाभ होणार आहे. त्यातून महाराष्ट्राचा विकास साध्य होईल. उदाहरणार्थ ग्रामीण रस्त्यांसाठी ३७८ कोटी रुपये मिळणार आहेत, तर इकॉनॉमिक क्लस्टरसाठी २८३ कोटी रुपये आणि पाटबंधारे कामांसाठी २०७ कोटी रुपये. नियोजित शहरीकरण आणि उद्योग तसेच उद्योजकतेला प्राधान्य या द्वारे हा अर्थसंकल्प राज्याच्या शाश्वत विकासासाठी पाया मजबूत करत आहे. विरोधी पक्षांनी राज्याला या अर्थसंकल्पातून काय मिळाले असा सवाल केला. पण त्यांच्या माहितीसाठी ही आकडेवारी सांगणे आवश्यक आहे, की ९८ हजार ३०६ कोटी रुपये मिळाले. यातून महाराष्ट्राची वाटचाल आणखी गतिमान होईल यात शंका नाही. विकसित भारत बनवण्याचे जे पंतप्रधान मोदी यांचे लक्ष्य आहे त्या दिशेने जाणारा हा अर्थसंकल्प भक्कम आहे. उद्योगांना प्रोत्साहन आणि गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती यांना अर्थसंकल्पात देण्यात आलेले महत्त्व हे शाश्वत वाढीसाठी ठोस पाया आहे. पायाभूत क्षेत्रासाठी १२ लाख कोटी रुपयांची तरतूद ही महाराष्ट्राला मिळालेली भेट. त्याशिवाय कृषी, मत्स्य उत्पादनासाठी ५०० तलाव आणि पशुसंवर्धन यासाठी भरीव तरतुदी यामुळे ग्रामीण महाराष्ट्राचे चित्र नक्कीच पालटेल. एकूण महाराष्ट्राला या अर्थसंकल्पातून एक लाख कोटी रुपयांचा लाभ मिळणार आणि यामुळे विरोधकांचे विशेषतः आदित्य ठाकरे यांचे म्हणणे आहे, की महाराष्ट्राला काही मिळाले नाही ते असत्य आहे आणि विरोधक डोके शहामृगासारखे वाळूत खूपसून बसत आहेत असे दिसते. महाराष्ट्रावर टीका होत आहे. कारण महाराष्ट्र राष्ट्रीय खजिन्यात जास्तीत जास्त भर टाकतो आणि तरीही त्याकडे दुर्लक्ष केले जाते ही टीका सर्वथा गैरलागू आहे. शेतकऱ्यांना पुरेसा पाठिंबा नाही अशी टीका होते, पण अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी नारळ, काजू आणि इतर पीक उत्पादक शेतकऱ्यांसाठी बरेच काही आहे.

## संस्कृत सुभाषित

अमित्रमुपसेवेत विश्वस्तवदविश्वसन् प्रियमेव
वदेन्नित्यं नाप्रियंकिंचिदाचरेत्।।
(शांतीपर्व, अध्याय १०३, ९, महाभारत)

अर्थ : शत्रूवर विश्वास न ठेवता विश्वास ठेवल्याचा बहाणा करून त्याच्या कलाने वागावे. त्याच्याशी नेहमी गोड बोलावे. त्याला न रुचणारी गोष्ट करू नये.

## गुरु वचन

### नशिबात असेल तेच मिळेल

एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडंभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते.

सोमिलकाने दुसऱ्या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, ''कशाला उगाच दुसऱ्या गावात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसऱ्या गावी जाऊनही उपयोग काय?'' तरी हट्टाने सोमिलक दुसऱ्या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कमावतो.

त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दमल्यामुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्यावेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आवाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो.

''अरे, कर्त्या... सोमिलकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त अन्नवस्त्रापुरताच पैसा आहे'' कर्म विचारतो. त्याबरोबर कर्ता उद्गारतो, ''त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!''

दे घोघेजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असते!

## उपदेशकथा

### वक्तशीरपणा

'तिसरी कसम' या चित्रपटाचे चित्रीकरण बिहारमधील पूर्णिया जवळच्या जंगलात सुरू होते. दिग्दर्शक बासू भट्टाचार्य यांना अगदी पहाटेचे एक दृश्य चित्रित करायचे होते म्हणून त्यांनी नायक राजकपूर यांच्या स्वीय सहायकाला दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाचला हजर राहण्यास सांगितले. त्याने राजकपूरना हा निरोप देण्यास साफ इन्कार केला. 'त्यांचा दिवस सकाळी अकरा वाजता सुरू होतो हे मला ठाऊक असताना माझी हिंमतच होणार नाही त्यांना पहाटे या म्हणून सांगायला.' मग दिग्दर्शक बासू भट्टाचार्य यांनीच ते काम स्वीकारले. ते राजकपूरला म्हणाले, 'उद्या मला दोन मोठ्या लोकांना बरोबर घेऊन काम करायचे आहे. वेळ पहाटे साडेपाचची आहे. मात्र, ती चुकली तर त्यातला एक मोठा माणूस निघून जाईल... एक मोठा माणूस म्हणजे साक्षात् सूर्यनारायण व दुसरे आपण स्वत: आहात.' दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाचला सर्वांच्या आधी राजकपूर स्वत: पोहोचलेले होते. एवढेच नाही तर संपूर्ण युनिटसाठी त्यांनी चहादेखील तयार ठेवलेला होता. सर्वांना शरमल्यासारखं झालं. राजकपूर कामात आपलं भान हरपून जातात हे साऱ्यांना पुन्हा एकदा कळलं.

कथा उपदेश : मोठी माणसं आपल्या कामाला नेहमी सर्वोच्च अग्रक्रम देतात.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:अतिगण्ड |
| ४ फेब्रुवारी २०२५ | २५:०४:०३+ |
| बुधवार | करण:वणिज १२:२०:०० |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:विष्टि २४:०९:४७+ |
| माघ शके संवत्– १९४७ | सूर्य:मकर |
| संवत्सर – विश्वावसूनाम | चन्द्र:सिंह |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४५ |
| मास– माघ | मुस्लिम मास – शाबान |
| ऋतु– सौर शिशिर | तारीख – १५ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:तृतीया | शब्बे बारात |
| २४:०९:४७+ | संत नरहरी सोनार |
| नक्षत्र:पूर्वाफाल्गुनी | पुण्यतिथी |
| २२:१२:३० | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८५०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | 6 | | 3 | 1 | 8 | | |
| 2 | | | 5 | 8 | | 4 | 1 | 3 |
| | 3 | | | 7 | | 9 | | 5 |
| | | | | | 3 | | | |
| | | 7 | | 2 | | 5 | | |
| | | | 7 | | | | | |
| 6 | | 8 | | 1 | | | 9 | |
| 7 | 1 | 2 | | 9 | 4 | | | 8 |
| | | 3 | 6 | 5 | | 1 | 7 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८४९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 8 | 2 | 1 | 4 | 3 | 9 | 7 | 5 |
| 5 | 9 | 4 | 7 | 8 | 2 | 6 | 3 | 1 |
| 7 | 3 | 1 | 6 | 9 | 5 | 2 | 4 | 8 |
| 9 | 4 | 6 | 3 | 5 | 8 | 1 | 2 | 7 |
| 2 | 7 | 3 | 4 | 6 | 1 | 5 | 8 | 9 |
| 8 | 1 | 5 | 2 | 7 | 9 | 3 | 6 | 4 |
| 3 | 2 | 7 | 5 | 1 | 4 | 8 | 9 | 6 |
| 4 | 5 | 9 | 8 | 3 | 6 | 7 | 1 | 2 |
| 1 | 6 | 8 | 9 | 2 | 7 | 4 | 5 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७९७ – क्युटो, इक्वाडोरमध्ये भूकंपाने ४०,००० ठार.
- १८४७ – मॅरीलंडमध्ये पहिली यूएस टेलीग्राफ कंपनीची स्थापना.
- १८७५ – बेलजीयमच्या गोथा येथे राजकुमारी लुईसीने राजकुमार फलीप वोनशी विवाह केला.
- १९९० – काहिराजवळ १० इस्राईली पर्यटकांची हत्या झाली.
- २००८ – अती वेगवान शर्यतीचा माजी विश्व विजेता अमेरिकाचा मॉरिस ग्रीनने अॅथलेटिक्समधून निवृत्ती घेतली.

### राष्ट्रीय

- २००७ – दोडात बस नदीत कोसळून १३ जण ठार.
- २००७ – सचिन तेंडुलकरचा विदेशात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम.

### जन्म

- १८९७ – जर्मनीचे पंतप्रधान लुडवीग इरहर्ड यांचा जन्म.
- १९०६ – यूएसचे ज्योतिषी सीलेड विलीयम टोमबग यांचा जन्म.
- १९१७ – पाकिस्तानचे नेते आगा याहया खान यांचा जन्म.
- १९२२ – 'भारत रत्न' पंडित भिमसेन जोशी यांचा जन्म.
- १९४८ – भारताचे फिरकी गोलंदाज राकेश शुक्ला यांचा जन्म.

### निधन

- १९२८ – भौतिकवादी हेनड्रीक ए. लोरेंट्ज यांचे निधन.
- १९५८ – बेलजियनचे राजकुमार फ्रीड्रीक डी मेरोड यांचे निधन.
- १९६६ – नॅशनल जॉगरोफीक सोसायटीचे अध्यक्ष गलबर्ट एड्रा. ग्रोसवेनर यांचे निधन.
- २००८ – अध्यात्मिक गुरू गगनगिरी महाराज यांचे निधन.

## : SMS :

Education related songs..
SCHOOL-Apni to Patshala
TUTION-Idhar chala mai udhar chala,
MATHS-Ajib Dastan hai ye kaha shuru kaha khatam..
SCIENCE- Aa khushi se khudkushi krle,
EXAM-Zehrili rate nind ud jati hai,
RESULT-jiya dhadak dhadak jaaye,
PASS-Aj mai uper asma niche,
FAIL-Jag suna suna lage..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| पुणे | २७.२ | १४.१ |
| पंढरपूर | २८.८ | १८.८ |
| सातारा | २८.३ | १०.७ |
| सांगली | २९ | १५.९ |
| सोलापूर | २९.१ | १९.१ |
| वर्धा | २९.९ | १६.२ |
| वाशिम | २८.३ | १८.४ |
| यवतमाळ | २९.२ | १८.७ |
| औरंगाबाद | २७.२ | १७.५ |
| अहमदनगर | २७.१ | १७.५ |
| अकोला | २९.७ | १८.१ |
| अमरावती | २९.२ | १६.७ |
| बीड | ३०.३ | १८.४ |
| भंडारा | २९.७ | १५ |
| बुलढाणा | २०.८ | १०.८ |
| चंद्रपूर | ३०.२ | १८.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पश्चिम
विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष दिले पाहिजे. विनाकारण एखाद्याशी वाद होऊ शकतो.

**तुळ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पश्चिम
धैर्य आणि सहनशीलता राखा. तसेच चालाखीने कामे हताळा.

**वृषभ :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : उत्तर
कामाविषयी उत्साह कायम राहिल. दुसऱ्यांची मदत करुन मानसिक सुख मिळवाल.

**वृश्चिक :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व
विश्वासाचे वातावरण राहिल. कुटूंबात योग्य ती कामे होतील. योग संभवतील.

**मिथुन :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
कामकाजात विस्तार होऊ शकेल. निर्णय घेताना घाई करू नका.

**धनु :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण
नोकरीत अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभेल. पत्नी सोबतच्या संबंधात गोडवा येईल.

**कर्क :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण
व्यापारातील विचार सार्थक ठरतील. कार्यकुशलता, परिश्रमाचे फळ मिळेल.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : उत्तर
कामाचे योग्य फळ पदरात पडेल. कौटूंबिक परिस्थिती समाधानी राहील.


**सिंह :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : उत्तर
उद्योग-धंद्यात निष्काजीपणा, उतावळेपणा करु नका. डोके शांत ठेवावे लागेल.

**कुंभ :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण
कठिण तसेच जबाबदारीच्या कामात विशेष सावधानतेचा परिचय द्यावा लागेल.

**कन्या :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण
अनेक दिवसांपासून रेंगाळलेली कामे पूर्ण होतील. धार्मिक आस्था वाढेल.

**मीन :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : पश्चिम
कामातील अडचणी दूर होण्याचे योग आहेत. मोठया लोकांशी भेटी होतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८५०



### आडवे शब्द

१. नारळाचा अर्धा भाग
३. मालिश
५. पाऊल
९. खटला, दावा
१०. थांबून थांबून, विश्रांती घेत
१२. नेत्रकटाक्ष
१५. राग आणणारे
१८. औषधाचे प्रमाण
१९. कार्य, काज
२०. एकाच्या हातून दुसऱ्याच्या हाती अशाप्रकारे
२१. झाकण असलेले पात्र
२३. विष्ठेचे खत
२४. माणूस
२६. वर्तमानपत्रातील कप्पा
२८. अपवित्र
३०. कर्ण
३१. रसाळ
३३. अनावश्यक, नको असता
३५. कावळ्याचे ओरडणे
३६. बाजेची कापडी पट्टी
३७. अपशकुन
३८. कुरआनातील आयात (ि‍क)
३९. मारणे
४१. संभाषण
४६. चेहऱ्यावरील कांती
४९. विद्वत्ता असली तरी घमेंड नको हे सांगणारा वाक्प्रचार
५३. तारांब, धांदल
५५. चंद्राची कड
५६. नामी युक्ती
५८. पातळसर
६०. मुलांची मांजर
६१. सगळी
६२. शाहीराजवळचे चर्मवाद्य
६३. दक्ष
६५. धनादेश
६७. तरुण्य
६८. उत्तराधिकारी
७०. ऐनवेळेला कच खाणारा
७३. पत्नी
७५. ऋण
७६. राख
७७. वाळलेले गवत, जनावरांचे खाद्य
७८. पसरलेले, विस्तृत

### उभे शब्द

१. दयामया नसलेला
२. नमस्कार
३. गम्माडीगंमत
४. मानवी कत्तल
५. गुरांचा समूह
६. कामदेव
७. आनंद
८. सुंदर डोळ्यांची
९. पदार्थाचा सूक्ष्म भाग
१०अ. वानर
११. कामापुरते नाते
१३. मृत्यूदेवता
१४. चोख सोन
१६. वडील
१७. तरुण, सैनिक
२०. यालाच जगन्नाथ समजावे!
२२. पोते
२३. शिडी, पायरी
२४. माणुसकी
२५. आशीर्वाद
२७. कृती
२९. न दिसणारी जखम
३०. चुलता
३२. पशू
३४. शक्ती, क्षमता
४०. बाराचा संच (इंग्रजी)
४२. बातमी
४३. शास्त्र, कला
४४. अंत:करण
४५. आत्याचा मुलगा
४७. देवदर्शनासाठी फिरणारा
४८. अधिक श्रेष्ठ
४९. दगाफटका करणारा
५०. नम्र
५१. कर्जाऊ रक्कम
५२. दु:ख
५४. घर
५६. हिशोब (हिंदी)
५७. तत्काळ, लगेच
५९. शरीराची ठेवण
६३. शिर्डीचे संत
६४. अभिनव
६५. उत्साह, जोम
६६. सिंह राशीतील नक्षत्र
६९. पुढचे पाठ आणि मागचे ---!
७०. लेखी विनंती
७१. ताठा, गर्व
७२. एखाद्याची बाजू घेणे, कार्यात हातभार लावणे म्हणजे -- उचलणे
७४. वरिष्ठांचा राग, संताप

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ८४९ चे उत्तर

आडवे उत्तर : १.सुंदर ३.वारेमाप ६.अलग अलग १०.वारकरी १२.लव १३.गड १४.वाचाळ १६.दानवीर १८.करामत २०.चूल २१.मग २२.सार २३.रबडी २४.धड २५.सगळीकडे २९.केर ३१.खोडकर ३३.पसायदान ३५.शतक ३७.करवा ३९.जरतर ४१.वहाण ४३.रसदार ४७.मलमल ४८.गेह ४९.रमतगमत ५२.पंकज ५४.नर ५५.नगरसेवक ५९.पावशेर ६१.मळमळ ६२.नास ६३.साल ६४.पात ६५.वदन ६७.नकार ६८.नमक ७०.वळकटी ७१.मध ७३.नवल ७५.नस ७६.अमोल ७८.नमस्कार ८०.रक्षक ८३.गवार ८५.कप्तान ८६.तरातर ८७.मदिरा ८८.यातना ८९.तराणे

उभे उत्तर : १.सुंठेवाचून खोकला गेला २.रवाळ ३.वारी ४.मालदार ५.पवन ६.अगरबत्ती ७.लड ८.अपराध ९.गवत ११.करंगळी १५.चाल १७.वीर १९.मडके २१.मगर २२.साडेसाती २५.सकवार २६.कप २७.अंदाज २८.अंत ३०.रमण ३२.डर ३४.नरम ३५.शरम ३६.कव ३८.बदाम ४०.तलवार ४२.हाटक ४४.सरतेशेवटी ४५.रतन ४६.रोम ५०.गरम ५१.तनमनधन ५२.पंक ५३.जहाल ५६.गळका ५७.सेना ५८.वसन ५९.पातळसर ६०.रद ६३.साकव ६४.पावन ६६.नटमोगरा ६९.मन जिंकणे ७२.फारकत ७४.लहान ७७.लवा ७९.महिना ८१.क्षत ८२.करा ८४.रया

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### निरोगी, सुसंस्कृत व प्रगतशील समाज घडावा


पुणे (दैनिक संध्या) : "समाजातील प्रत्येक घटकाचे आरोग्य महत्वाचे असते. निरोगी, सुसंस्कृत व प्रगतशील समाजाची जडणघडण व्हावी, यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे. समाज आरोग्यदृष्ट्या सशक्त झाला, तरच तो सर्वांगीण प्रगती साधू शकतो. त्यामुळे सुरक्षित व आनंदी समाज घडविण्यात संस्थेने पुढाकार घ्यावा," असे मत प्रोलाईफ फर्टिलिटी अँड मदर केअरचे तज्ज्ञ डॉ. जीवन चौधरी यांनी व्यक्त केले. पुणे जिल्ह्यातील गुजर समाजाची विश्वासार्ह असलेल्या गुजर स्नेहवर्धिनी संस्थेतर्फे आयोजित वार्षिक स्नेहमेळाव्यात डॉ. चौधरी बोलत होते. गुजर समाजाच्या ऐक्याचा, उद्यमशीलतेचा व संस्कारांचा हा सोहळा हडपसर येथील आकाश लॉन्समध्ये नुकताच झाला. गुजर स्नेहवर्धिनी पुणेचे अध्यक्ष अजय गुजर यांनी स्नेहमेळाव्याचे अध्यक्षस्थान भूषविले. डॉ. प्रशांत चौधरी यांनी संयोजन केले. प्रसंगी ज्येष्ठ विचारवंत संजय कुलकर्णी, पुणे जिल्हा सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन, महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सचिव अनिल गुजर, भारती आयुर्वेद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अभिजीत पाटील, बांधकाम व्यावसायिक भागवत पाटील, निवृत्त न्यायाधीश दिनेश महाजन, संस्थेचे सचिव सचिन शहा, कार्याध्यक्ष दीपक पाटील, उपाध्यक्ष प्रदीप पाटील व पंकज चाचरे, खजिनदार संदीप पाटील, विश्वस्त डी. एस. चौधरी आदी उपस्थित होते. पुणे जिल्ह्यातील सुमारे ८०० गुजर समाजबांधवांनी उपस्थिती लावली. समाजातील निरंजन गोपीचंद महाजन, विजय तुकाराम पाटील, रवींद्र पांडुरंग चौधरी, प्रशांत शांताराम महाजन आणि दीपक नंदकिशोर पाटील या पाच कर्तृत्ववान तरुण उद्योजकांना 'गुजररत्न-तरुण उद्योजक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. तसेच दहावी व बारावी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या, पदव्युत्तर परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

### पुणे ग्रामीण जिल्ह्यात 19 फेब्रुवारीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

पुणे (दैनिक संध्या) : पुणे ग्रामीण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्यादृष्टीने अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी ६ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री १२.०५ वाजल्यापासून ते १९ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे, दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे, शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणत्याही इसमाच्या चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढाऱ्यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे, मोठ्याने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध करण्यात आला आहे. सभ्यता अगर नीतिमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, आविर्भाव करणे, कोणतेही जिन्नस तयार करुन त्याचा जनतेत प्रसार करणे, कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पद्धतीने महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) व (३) विरुद्ध वर्तन करणे, कलम ३७ चे पोट कलम (३) अन्वये पाचपेक्षा जास्त लोकांचा जमाव करणे तसेच पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या पूर्वपरवानगीशिवाय सभा घेणे किंवा मिरवणूक काढणे यासदेखील प्रतिबंध करण्यात आला आहे. हा आदेश शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे व त्याबाबत परवानगी आहे त्यांना लागू होणार नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### महापारेषणच्या अतिउच्चदाब उपकेंद्रात बिघाड; वीज पुरवठ्यावर परिणाम

पुणे (दैनिक संध्या) : महापारेषण कंपनीच्या २२० के.व्ही. भोसरी अतिउच्चदाब उपकेंद्रातील ८० एमव्हीए (MVA) क्षमतेच्या अतिउच्चदाब रोहित्रामध्ये सोमवारी (दि.२) दुपारी तीन वाजेच्या सुमारास अंतर्गत बिघाड झाला आहे. महापारेषण व महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी त्याच्या दुरुस्तीसाठी अथक परिश्रम घेतले मात्र ते दुरुस्त होऊ शकले नाही. परिणामी या अतिउच्चदाब रोहित्रावर अवलंबून असलेला ८० एमव्हीएचा वीजभार बाधित झाला असून भोसरी व पिंपरी विभागातील वीज ग्राहकांवर त्याचा परिणाम होणार आहे. पर्यायी व्यवस्थेसाठी युद्धपातळीवर प्रयत्न महावितरणच्या भोसरी व पिंपरी विभागामार्फत पर्यायी व्यवस्थेच्या माध्यमातून वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर दुसऱ्या वीज वाहिनीवर भार टाकावा लागणार असल्यामुळे वीजपुरवठा सुरळीत करताना त्यात अडचणी येऊ शकतात. त्यावर मात करण्यासाठी महावितरणतर्फे त्वरीत उपाययोजना करण्यात येणारच आहेत. अचानक उद्भवलेल्या या वीज संकटावर मात करण्यासाठी महावितरणचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत. अशावेळी वीज ग्राहकांनीही महावितरणला सहकार्य करावे, विजेचा वापर काटकसरीने करावा असे आवाहन महावितरण प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.



### 'तुझे लग्न जमू देणार नाही, कुटुंबीयाचा खून करेल', प्रियकराची धमकी, लग्नही मोडले

पुणे (दैनिक संध्या) : 'तुझे लग्न जमू देणार नाही. तुझ्या कुटुंबीयाचा खून करेल', यासह तिच्या कुटुंबियांना जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी येरवड्यातील लक्ष्मीनगर पोलिसांनी एका तरुणाला अटक केली. याबाबत एका २१ वर्षाच्या तरुणीने लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणीचे आरोपीशी चार वर्ष प्रेमसंबध होते. तरुणीच्या कुटुंबीयांनी तिचे लग्न ठरविले. त्यामुळे तरुणीने त्याला प्रेमसंबंध ठेवू नको, माझे लग्न ठरले आहे, असे आरोपीला सांगितले. त्यानंतर आरोपी तरुणाने 'तुझे लग्न जमू देणार नाही. तुझ्या कुटुंबीयाचा खून करेल', असे म्हणत तरुणीला शिवीगाळ करुन धमकावले. तसेच आरोपीने तरुणीच्या आईला तीक्ष्ण शस्त्राचा धाक दाखवून तिला जीवे मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर आरोपी तरुणाने तरुणीचा ज्याच्याशी लग्न ठरले होते. त्याला प्रेमसंबंधाची छायाचित्रे पाठविली. नियोजित पतीने लग्न मोडले. या घटनेनंतर तरुणीने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक जगताप तपास करत आहेत.

# पुणे जिल्हा राष्ट्रीय मजदूर काँग्रेस कार्यालयाचे भव्य उद्घाटन

**महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. डॉ. कैलास भाऊ कदम यांच्या शुभहस्ते**




पुणे (दै. संध्या) :

पुणे जिल्हा राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) चे जिल्हाध्यक्ष मा. विजय सुदामराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्हा इंटकच्या जिल्हा मुख्यालय/कार्यालयाचे उद्घाटन कामठे पाटील नगर, कोंढवा बु., येवलेवाडी (पुणे) येथे महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) चे प्रदेशाध्यक्ष मा. डॉ. कैलास भाऊ कदम यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडले.

या उद्घाटन सोहळ्यासाठी कामगार क्षेत्रातील विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच संघटित व असंघटित कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. अमिनेशन फॅक्टरीचे मान्यवर पदाधिकारी श्री. धुमाळ साहेब यांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय ठरली.

या प्रसंगी पुणे जिल्हा राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) ची ३६ सदस्यीय जिल्हा कार्यकारणी जिल्हाध्यक्ष मा. विजय जाधव यांच्या वतीने प्रदेशाध्यक्ष मा. डॉ. कैलास भाऊ कदम यांच्याकडे औपचारिकरित्या सादर करण्यात आली. उद्घाटन कार्यक्रमादरम्यान जिल्हाध्यक्ष मा. विजय जाधव यांनी पुणे जिल्ह्यातील संघटित व असंघटित कामगारांच्या विविध ज्वलंत प्रश्नांकडे प्रदेशाध्यक्षांचे लक्ष वेधले. कामगारांचे न्यायहक्क, मान-सन्मान, आरोग्य सुविधा, कामगार वसाहतींचे प्रश्न, रोजगार सुरक्षेचे मुद्दे तसेच कामगारांवर होणारे अन्याय याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रदेशाध्यक्ष मा. डॉ. कैलास भाऊ कदम यांनी सांगितले की, "आगामी काळात पुणे जिल्ह्यातील तळागाळातील प्रत्येक संघटित व असंघटित कामगाराच्या प्रश्नासाठी राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) कटिबद्ध राहील. कामगारांच्या प्रत्येक न्याय्य हक्कासाठी इंटकच्या माध्यमातून ठामपणे आवाज उठवण्यात येईल," असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमात जाहीर झालेली पुणे जिल्हा राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) ची जिल्हा पदाधिकारी यादी पुढीलप्रमाणे — कार्याध्यक्ष : शंकर जाधव जिल्हा उपाध्यक्ष : अनिल शिंदे, तुकाराम शेंडगे उपाध्यक्ष : राजूभाई पठाण, गोविंदराव अटक जिल्हा सचिव : दिनेश गवळी, संग्राम जाधव, प्रकाश सावंत चिटणीस : पोपटराव चौगुले, गंगाराम शेगर, नितीन चव्हाण सरचिटणीस : दीपक पकाले जिल्हा संघटक : दीपक कुमावत जिल्हा खजिनदार : पिंकी जाधव जिल्हा सहसंघटक : मोहन शिंदे, मोहन निंबाळकर, दगडू पवार या उद्घाटन कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पुणे जिल्हा राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) चे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व कामगार बांधवांनी मोलाचे योगदान दिले.

# परशुराम वाडेकर यांच्या उपमहापौर निवडीचे स्वागत

**आंदोलकाला उपमहापौर केल्याबद्दल आठवले व फडणवीस यांचे आभार : बाळासाहेब जानराव**

पुणे (दै. संध्या) :




पुणे महानगरपालिकेच्या उपमहापौरपदी रिपब्लिकन पक्षाचे राज्य कार्यकारिणीचे संघटक सचिव परशुराम वाडेकर यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय मंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे तसेच सभागृह नेते गणेश बिडकर यांचे रिपब्लिकन पक्षाचे प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव यांनी विशेष पत्राद्वारे अभिनंदन व आभार व्यक्त केले आहेत. परशुराम वाडेकर यांच्या उपमहापौरपदी निवडीबद्दल बाळासाहेब जानराव यांच्यासह माजी उपमहापौर सुनिताताई वाडेकर, नगरसेविका हिमाली कांबळे, नगरसेवक निलेश आल्हाट, नगरसेविका निशा मानवतकर, पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, जयदेव रंधवे, संगीताताई आठवले, उमेश कांबळे, संदीप धांडोरे, गणेश जगताप आदी पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

यावेळी बोलताना बाळासाहेब जानराव म्हणाले की, "परशुराम वाडेकर यांचा ३५ वर्षांहून अधिक कालावधीचा सामाजिक व राजकीय संघर्ष लक्षात घेता, सर्वसामान्य आंदोलक ते पुण्यनगरीचे उपमहापौर असा त्यांचा प्रवास अत्यंत अभिमानास्पद आहे. त्यांच्या या यशाबद्दल विशेष अभिनंदन."

# २ दुचाकींची समोरासमोर धडक; तरुणाचा मृत्यू

पुणे (दै. संध्या) :

जुन्नर तालुक्यातील ओतूर–ब्राह्मणवाडा जिल्हा मार्गावर ओतूर गावाच्या हद्दीतील फापाळेशिवार येथे सोमवारी (दि. २) रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन एका तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. वसंत सुरेश मुठे (वय २८, रा. त्रिशुलवाडी सातेवाडी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) असे मृत तरुणाचे नाव असल्याची माहिती ओतूर पोलिसांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, अमोल लक्ष्मण गिते (रा. राहाटी मळा, ओतूर, ता. जुन्नर) हे दुचाकीवरून ओतूरच्या दिशेने जात होते. त्याचवेळी वसंत मुठे व त्यांचा मित्र अक्षय पांडुरंग मोढवे हे दुचाकीवरून ओतूरहून ब्राह्मणवाड्याकडे निघाले होते. दरम्यान, फापाळेशिवार हद्दीत दोन्ही दुचाकींची समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात दोन्ही दुचाकींवरील तिन्ही तरुण गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करत जखमींना आळेफाटा येथील युनिक हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचार सुरू असताना वसंत मुठे यांचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी अमोल लक्ष्मण गिते याच्याविरुद्ध ओतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# डॉ. दिनेश गुलाब चव्हाण यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची पीएचडी

पुणे (दै. संध्या) :



नाथ जोगी–भराडी समाजाचा पारंपरिक उदरनिर्वाह भिक्षेवर आधारित असताना, डॉ. दिनेश यांनीही हा व्यवसाय स्वतः केला होता . अत्यंत कठीण परिस्थितीत त्यांच्या आई-वडिलांनी त्यांना शिक्षणासाठी सातत्याने पाठबळ दिले आणि त्याच बळावर त्यांनी शिक्षणाचा मार्ग ठामपणे निवडला. पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण त्यांनी आश्रम शाळेत पूर्ण केले व उच्च शिक्षण हे समाज कल्याणचे होस्टेल मध्ये राहून पूर्ण केले. नाथ जोगी–भराडी या भटक्या समाज परंपरेने अत्यंत मागासलेला व शिक्षणाच्या संधींपासून वंचित राहिलेला आहे. अशा परिस्थितीतून पुढे येत वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून महाराष्ट्रात नाथ जोगी–भराडी या भटक्या समाजातून पीएचडी पदवी प्राप्त करणारे डॉ. दिनेश गुलाब चव्हाण हे पहिले व्यक्ती ठरले आहेत. त्यांनी मुंबई येथील नामवंत सेठ जी.एस. वैद्यकीय महाविद्यालय येथून डॉ. अमिता मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पदवी प्राप्त केली.

डॉ. दिनेश गुलाब चव्हाण हे यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी व मागासलेल्या पट्ट्यातील करणवाडी (ता. पांढरकवडा) येथील मूळचे रहिवासी आहेत. सध्या ते ढोले पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, पुणे येथे प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. या यशाबद्दल ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्री सागर ढोले पाटील यांनी त्यांचे अभिनंदन करून विशेष पारितोषिक जाहीर केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुणशेकरण आणि डॉ. अक्षय खटावकर यांनीही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. डॉ. दिनेश गुलाब चव्हाण यांचे हे यश भटक्या व वंचित समाजातील विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणारे आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदेश

पुणे (दै. संध्या) :

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ शांततेत, निर्भय आणि न्याय वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत, सदरचे आदेश जिल्ह्यात ९ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अंमलात राहणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधीनी किंवा त्यांच्या हितचिंतक, मुद्रणालयाचे मालक व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापतांना निर्बंध घालण्यात येत आहेत. यामध्ये इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे नमूना मतपत्रिकेसाठी कागद वापरणे तसेच कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिकेची छपाई करणे. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, सर्व तालुका

कोणत्याही राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधी, हितचिंतकांनी निवडणूकीच्या प्रचारासाठी झेंडयाच्या काठ्या उभारणे, कापडी फलक लावणे, भित्तीपत्रक लावणे, घोषणा लिहिणे इत्यादीकरीता कोणत्याही व्यक्तींच्या खाजगी जागा, इमारत, आवार, भिंती आदीवर संबंधित मालक व सार्वजनिक प्राधिकरणाची परवानगीशिवाय वापर करण्यावर निर्बंध घालण्यात आले आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३ तसेच इतर प्रचलित कायद्यांन्वये शिक्षेस पात्र राहील, असेही जिल्हादंडाधिकारी श्री. डुडी यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

दंडाधिकारी कार्यालये आणि सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय व विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे रस्त्यावर कोणताही राजकीय पक्ष, व्यक्ती, संघटना, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधीनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी धरणे आंदोलन, मोर्चा, निर्देशने, उपोषण करणे या बाबी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. निवडणूक प्रचाराचे साहित्य, सार्वजनिक इमारतीचे ठिकाण, सार्वजनिक रस्त्यावर निवडणूकी संबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेटस, कटआऊटस, होर्डिंग्ज, कमानी आदी रहदारीस अडथळा निर्माण होईल व अपघात होईल अशा पध्दतीने लावण्यावर निर्बंध घालण्यात येत आहे. कोणत्याही राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी, किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणूक प्रचारासाठी १० पेक्षा अधिक मोटार गाड्या, वाहनांचा ताफ्याचा वापर करण्यावर निर्बंध घालण्यात येत आहे.

निवडणूक प्रचारासाठी ध्वनीक्षेपकाचे वापरावरील निर्बंध: कोणतीही व्यक्ती, संस्था, पक्ष, कार्यकर्ते यांनी ध्वनीक्षेपकाचा वापर पोलीस अधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही. सकाळी ६ वाजण्यापूर्वी आणि रात्री १० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपणाचा वापर करता येणार नाही तसेच प्रचाराकरीता ध्वनी क्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा, फिरणाऱ्या वाहनास रस्त्यावरुन धावत असतांना ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. सर्व राजकीय

प्रचाराकरिता वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचे फलक लावणे, झेंडे लावणे आदीबाबत निर्बंध: फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रिन ग्लासच्यापुढे राहणार नाही आणि तो त्यावाहनाच्या टपापासून २ फुट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजुस लावू नये. वाहनावर लावायचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष उमेदवार, प्रतिनिधी, निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहना व्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही.

पक्ष आणि उमेदवार व इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापरासंबंधीच्या परवानगीबाबत माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील.

# युट्यूब मालिकेमुळे कलाविश्वाला एक नवीन व्यासपीठ मिळेल - मेघराज राजेभोसले

**'तुझ्याचसाठी - एक मन विखुरलेलं' या वेबमालिकेचा भव्य लॉन्च सोहळा उत्साहात संपन्न**

पुणे (दै. संध्या) :




चित्रपट, ओटीटी आणि टीव्ही या तीनही माध्यमांचा आपला प्रेक्षक वर्ग , आर्थिक गणित वेगवेगळे आहे. अनेकांना मालिका करायच्या आहेत मात्र टीव्हीच्या मर्यादा लक्षात घेता सर्वांना संधि मिळतेच असे नाही. आज मराठी मनोरंजन विश्व एक नवीन सुरुवात करत आहे ते म्हणजे युट्यूब मालिका, तुझ्याचसाठी - एक मन विखुरलेलं या मालिकेमुळे मराठी कलाविश्वाला नवीन व्यासपीठ मिळेल असा विश्वास अखिल भारतिय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांनी व्यक्त केला. पुणे श्रमिक पत्रकार संघ येथे आयोजित कार्यक्रमात 'तुझ्याचसाठी - एक मन विखुरलेलं; या पहिल्या मराठी यूट्यूब मालिकेचा लॉन्च सोहळा उत्साहात संपन्न झाला, यावेळी राजेभोसले बोलत होते. याप्रसंगी प्रसिद्ध गायक साजन बेंद्रे, सुप्रसिद्ध अभिनेते शिवभक्त सचिन गवळी, या वेबमालिकेचे निर्माते सर्जेराव गायकवाड आणि राम अश्रुजी पाटील , दिग्दर्शक ओंकार नागनाथ पिंपळे यांच्यासह मालिकेतील सर्व कलाकार व तंत्रज्ञ उपस्थित होते.

पुढे बोलताना मेघराज राजेभोसले म्हणाले, आपल्याकडे गुणवंत कलाकार अनेक आहेत, माध्यमांच्या मर्यादेमुळे सर्वांना संधि मिळत नाही या मालिकेच्या निमित्ताने एक नवीन व्यासपीठ कलाकारांना मिळेल, या मालिकेचे निर्माते त्यांचे आर्थिक गणीतही जुळवतील कारण निर्मात्याला त्यांचे पैसे रिटर्न मिळणे अत्यंत महत्वाचे असते. नव्या माध्यमावर ही संपूर्ण टीम मेहनत घेत आहे त्यांना निश्चित यश मिळेल, तसेच मालिकेच्या संकल्पनेचे कौतुक करत, मराठी डिजिटल माध्यमांसाठी ही मालिका मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी साजन बेंद्रे, सचिन गवळी, सर्जेराव गायकवाड, राम पाटील आणि दिग्दर्शक ओंकार नागनाथ पिंपळे यांनी आपल्या मनोगतातून मालिकेच्या निर्मिती मागील भूमिका विषाद केली. 'तुझ्याचसाठी - एक मन विखुरलेलं' ही पहिली यूट्यूब मालिका येत्या 9 फेब्रुवारी पासून सोमवार ते शुक्रवार सायंकाळी 8 वाजता प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर सोनवणे यांनी केले.

# हंगामा ओटीटीची लोकप्रिय अँथॉलॉजी 'हसरतें' तिसऱ्या सीझनसह सह पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला

## सहा महिला, सहा कथा आणि स्वतःला निवडण्याची एक अटूट गरज




**मुंबई (दै. संध्या) :**

भारतातील आघाडीच्या डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटीने आपल्या लोकप्रिय अँथॉलॉजी हसरतें चा तिसरा सीझन जाहीर केला आहे. महिलांच्या मनातील भावना, न बोललेल्या इच्छा आणि शांत बंडखोरी यांचा शोध घेणाऱ्या या मालिकेचा नवा अध्याय प्रेक्षकांसमोर येत आहे. पहिल्या दोन सीझनच्या मोठ्या यशानंतर, सीझन 3 मध्ये गुदमरून टाकणारी वैवाहिक नाती, कठोर परंपरा, राजकीय डावपेच आणि भावनिक दुर्लक्षामुळे घडलेल्या आयुष्यांच्या कथा अधिक खोलवर मांडल्या आहेत.

गेल्या काही वर्षांत हसरतें ने सहसा न सांगितल्या जाणाऱ्या कथा मांडत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. महिलांच्या इच्छा, ओळख आणि समाजाच्या बंधनांमधील संघर्ष प्रामाणिकपणे दाखवल्यामुळे ही मालिका प्रेक्षकांच्या मनाला भिडली आहे. सीझन 3 मध्ये थ्रिलर, गुन्हेगारी आणि ड्रामा यांचा संगम असलेले सहा प्रभावी भाग आहेत. प्रत्येक कथा धाडसी, भावनिक आणि माणुसकीने भरलेली आहे. हसरतें सीझन 3 चे पहिले दोन भाग 22 जानेवारी रोजी प्रदर्शित झाले, त्यानंतर 27 जानेवारी रोजी आणखी दोन भाग आले, आणि शेवटचे दोन भाग 4 फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होतील.

हसरतें सीझन 3 मध्ये सहा प्रभावी कथा आहेत, ज्या महिलांच्या शांततेतून, संघर्षातून आणि आत्मजागृतीच्या प्रवासातून उलगडतात. हल्ला बोल या कथेत ज्योतीची गोष्ट आहे. ती छळ सहन करणारी पत्नी असून, तिला बाहुली म्हणून राजकारणात ढकलले जाते. हळूहळू ती स्वतःचा आवाज शोधते आणि नियंत्रणाविरुद्ध उभी राहते. ब्युटी पार्लर मध्ये लखनौची सलमा ही गरीब परिस्थिती, मातृत्व आणि दुर्लक्षित वैवाहिक नातं सांभाळताना दिसते. सुरक्षिततेसाठी तिला आपल्या सन्मानाची किती किंमत मोजावी लागते, याचा ती सामना करते. मिडनाईट ब्राइड ही कथा अनन्याची आहे. ती एक तरुण विधवा असून हवेलीतील कठोर नियमांमध्ये अडकलेली आहे. कला आणि एका अनपेक्षित व्यक्तीमुळे तिच्या दडलेल्या इच्छा आणि भावना समोर येतात. दो अनजाने मध्ये दोन अनोळखी व्यक्ती एकत्र येतात — एक छळ सहन करणारी पत्नी आणि खोट्या आरोपांमध्ये अडकलेला एक पुरुष. दंगलीने ग्रासलेल्या एका रात्रीत त्यांना थोडीशी आशा मिळते. गुपचूप रसोई मध्ये दुर्लक्षित अन्नलेखिका निर्मला, स्वयंपाकघराला बंडखोरीचं स्थान बनवते. तिथे तिला स्वतःची ओळख मिळते, पण त्याच वेळी धोक्यालाही सामोरं जावं लागते. शेवटी नया किरायेदार ही कथा स्मिताची आहे. पतीच्या अचानक गायब झाल्यानंतर तिच्या मनातील शांत ओढ दाखवली आहे. सततच्या देखरेखीखाली जगणाऱ्या तिच्या आयुष्यात एका तरुण संगीतकाराचं आगमन तिचं आयुष्य बदलून टाकते.

आपल्या भूमिकेबद्दल आणि कथेबद्दल बोलताना मोनालिसा म्हणते, "गुपचूप रसोई ही कथा आवाज न करता स्वतःसाठी उभं राहण्याबद्दल आहे. महिलांविषयी, त्यांच्या आत्मसन्मानाविषयी आणि स्वतःला प्राधान्य देण्याच्या महत्त्वाबद्दल बोलणाऱ्या भूमिका करायला मला खूप आवडतात. दडपशाही आणि अपमानाला सामोरे जाण्यापासून ते स्वयंपाकाच्या आवडीतून स्वतःचे आत्म-सन्मान शोधण्यापर्यंतचा निर्मलाचा प्रवास अनेक स्त्रियांना आपलासा वाटेल. ही कथा स्वतःला निवडण्याची, अनपेक्षित ठिकाणी ताकद शोधण्याची आणि स्वातंत्र्य आपल्या आतूनच सुरू होते याची जाणीव करून देणारी आहे."

नया किरायेदार मध्ये स्मिताची भूमिका साकारणारी चाहत पांडे म्हणते,"स्मिता भावनिकदृष्ट्या एकटी पडलेली आहे. तिला टीकेचा भार सहन करावा लागतो आणि ती असे आयुष्य जगत आहे जिथे तिच्या गरजा बऱ्याच काळापासून दाबल्या गेल्या आहेत. इच्छा आणि कर्तव्य, भीती आणि स्वातंत्र्य यांच्यातला तिचा अंतर्गत संघर्ष मला खूप भावला. तिचा प्रवास फक्त बंडखोरीचा नाही, तर अनेक वर्षांच्या दुर्लक्षानंतर स्वतःचं अस्तित्व आणि हक्क पुन्हा मिळवण्याचा आहे. प्रेक्षकांनी तिची असुरक्षितता अनुभवावी आणि शेवटी स्वतःला निवडण्यासाठी किती धैर्य लागतं, हे समजून घ्यावं, अशी माझी अपेक्षा आहे."

नया किरायेदार मध्ये समर्थची भूमिका करणारा सुबीर राणा म्हणतो,"समर्थ स्मिताच्या आयुष्यात येतो आणि तिचं संपूर्ण जगच बदलून टाकतो. अनेक वर्षांपासून ती टाळत असलेल्या भावना तो बाहेर आणतो. ही कथा न बोललेल्या इच्छा, समाजाकडून होणारा न्यायनिवाडा आणि वैयक्तिक आनंद व सामाजिक अपेक्षा यामधील सततच्या संघर्षावर आधारित आहे. ही कथा अनेक थरांची, भावनिक आणि माणुसकीने भरलेली आहे."

हसरतें सीझन 3 चे सर्व भाग आता हंगामा ओटीटी आणि भागीदार प्लॅटफॉर्मवर स्ट्रीमिंगसाठी उपलब्ध आहेत. 22 जानेवारी आणि 4 फेब्रुवारी रोजी नवे भाग प्रदर्शित होतील.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### टॅलेंटकॉर्प सोल्यूशनच्यावतीने अजित पवार यांना श्रद्धांजली

चाकण (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त करून चाकण येथे टॅलेंटकॉर्प सोल्यूशनच्या वतीने दोन मिनिटांचे मौन पाळून दादांना श्रद्धांजली वाहण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस व येथील उद्योजक डॉ. मेहबूब सैय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली चाकण येथे श्रद्धांजली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. शांतता व शिस्त पाळत सामूहिकरित्या मौन धारण करून तरुणींनी मानवी सहवेदना, एकात्मता आणि सामाजिक जाणीवेचे दर्शन घडवले. या मौनातून दुःख व्यक्त करताना संवेदनशीलतेचा एक सशक्त संदेश समाजाला देण्यात आला. डॉ. सैय्यद यांनी सांगितले की," सार्वजनिक जीवनात कार्यरत असलेल्या नेत्यांप्रती आदर व संवेदनशीलता व्यक्त करणे हे प्रत्येक सजग नागरिक व संस्थेचे नैतिक कर्तव्य आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी युवकांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी सातत्याने भरीव योगदान दिले आहे. औद्योगिक विकास, कौशल्य प्रशिक्षण, एमएसएमई क्षेत्राचा विस्तार तसेच उद्योजकतेला प्रोत्साहन देणाऱ्या विविध योजना राबवून त्यांनी राज्यातील हजारो तरुणांना रोजगाराभिमुख बनवण्याचे कार्य केले. ग्रामीण व शहरी भागातील युवकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी स्वयंरोजगाराला चालना देणाऱ्या धोरणांमुळे अनेक कुटुंबांचे जीवनमान उंचावले असून, महाराष्ट्राच्या रोजगार निर्मितीत त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे."

### दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणासाठी गुजरातच्या उद्योगपतीची मध्यस्थी

मुंबई (दैनिक संध्या) : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राज्याच्या राजकारणात घडामोडी घडत असताना राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा रंगत आहेत. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चा सध्या राजकीय वर्तुळात चांगल्याच रंगू लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी विलिनीकरणा करीता गुजरात मधील मोठ्या उद्योगपतीकडून मध्यस्थी केली जात असल्याचा खळबळजनक दावा केला आहे. वड्डेट्टीवार यांनी माध्यमांशी संवाद साधताना थेट मोठं भाष्य केले आहे. विलीनीकरणासाठी गुजरातमधील काही मोठ्या उद्योगपतींकडून मध्यस्थी करण्यात आली आहे, असा दावा विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. विलीनीकरणासाठी सर्वांत मोठा अडथळा म्हणजे एनडीए सोबत राहण्याची अट महत्वाची आहे. एनडीएला पाठिंबा देण्याची अट मान्य असेल यावर फक्त एकमत होणे बाकी आहे, असे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. तसेच, वडेट्टीवार यांनी असेही नमूद केले की, जर एनडीए सोबत राहण्याची अट मान्य असेल तरच विलीनीकरणाचा निर्णय अंतिम स्वरूपात घेता येईल.

# भारत अमेरिकेच्या तालावर नाचतोय का?

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या दाव्यांवरून प्रकाश आंबेडकरांचा मोदी सरकारला सवाल!



**मुंबई (दै. संध्या) :**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल ट्विट करत जाहीर केले आहे की, भारत रशिया कडून तेल खरेदी करणार नाही, त्याबदल्यात अमेरिकेकडून तेल खरेदी करेल तसेच अमेरिकेकडून शेतमालाची खरेदी सुद्धा भारत करेल त्या बदल्यात टेरिफ कर कमी करून तो २५ टक्क्यांवरून १८ टक्के करण्यात आला आहे.

यावरूनच वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केंद्र सरकारवर सडकून टीका केली आहे. भारत सरकार अमेरिकेच्या दबावापुढे शरण गेली आहे का, असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी त्यांच्या ट्विटर पोस्ट करत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांना थेट प्रश्न विचारले आहेत. पाकिस्तानसोबत झालेल्या शस्त्र संधीमध्ये (सीजफायर) डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्याचा जो दावा केला आहे, तो भारत सरकार मान्य करत आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच ट्रम्प यांनी केलेल्या आणखी एका दाव्याचा उल्लेख करत आंबेडकर यांनी स्पष्टता मागितली आहे. भारताने रशियन तेल खरेदी थांबवून अमेरिकेकडून आणि संभाव्यतः व्हेनेझुएलाकडून अधिक तेल खरेदी करण्यास सहमती दर्शवली आहे, असे ट्रम्प यांनी म्हटले होते. हा दावा खरा आहे का? असे प्रश्न ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी विचारला आहे. तसेच भारत खरोखरच रशियन तेलाऐवजी अधिक महाग तेल अमेरिकेकडून आयात करणार आहे का?, असा सवाल त्यांनी केला. याशिवाय भारत अधिक प्रमाणात अमेरिकन कृषी उत्पादने आयात करणार आहे का, याबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. असे झाल्यास भारतीय शेतकऱ्यांवर प्रचंड आर्थिक दबाव येईल आणि देशातील एकूण कार्यबलाच्या सुमारे ४० टक्के असलेल्या शेतकरी वर्गाची उपजीविका धोक्यात येईल, असे त्यांनी म्हटले आहे.

## केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना निवडणूक कर्तव्यातून सूट



**मुंबई (दै. संध्या) :**

'केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा' (सी-टीईटी) देणाऱ्या शिक्षकांना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या कर्तव्यातून सूट देण्यात आली असून, तसे निर्देश सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आल्यानंतर १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीच्या मतदानाच्या तारखेत बदल करण्यात आला. त्यानुसार आता ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे.

त्याच वेळी राज्यातील काही शिक्षकांची सी-टीईटी परीक्षा असल्यामुळे संबंधित शिक्षकांना निवडणूक कर्तव्यातून सूट देऊन, पर्यायी व्यवस्था करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत.



## सुप्रिम कोर्टाने आमदार रोहित पवार यांना फटकारले

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) च्या सदस्य नोंदणी प्रकरणी सुप्रीम कोर्टाने आमदार रोहित पवारांना जोरदार फटकारले आहे. एमसीएमध्ये रोहित पवार यांनी ४०० आजीवन सदस्यांची बेकायदेशीर नोंदणी केल्याचा आरोप त्यांच्यावर होता. या सदस्यांमध्ये कुटुंबातील व्यक्तींचा समावेश असल्याचेही म्हटले जात होते. या प्रकरणी केदार जाधव यांनी आक्षेप घेत सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. यापूर्वी उच्च न्यायालयाने या प्रकरणावर अंतरिम स्थगिती दिली होती. आज झालेल्या सुनावणी दरम्यान सुप्रीम कोर्टाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. कोर्टाने रोहित पवारांना थेट विचारणा केली की, "तुम्ही बेकायदेशीर कामे करता. केस मागे घेता की डिसमिस करू?" या कठोर भूमिकेनंतर रोहित पवारांनी अखेर हे प्रकरण मागे घेतले. सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयांमुळे एमसीए सदस्य नोंदणीतील अनियमितता आणि त्यावरील कायदेशीर कारवाई पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. कोर्टाच्या आदेशानुसार पुढील कारवाई क्रमप्राप्त आहे.

# विकसित भारत हे प्रत्येक नागरिकाचे स्वप्न असले पाहिजे

**पुणे (दै. संध्या) :**

- अविनाश धर्माधिकारी
- नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे 'भारत 2047 आणि मी' व्याख्यानमालेचे आयोजन




स्वच्छ, चारित्र्यवान, प्रामाणिक आणि कार्यक्षम प्रशासकीय अधिकारी ही देशाची संपत्ती आहे. आपले काम प्रामाणिकपणे करणारा प्रत्येकजण हा देशभक्त आहे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला जेव्हा शंभर वर्ष पूर्ण होत आहेत तेव्हा 2047 मध्ये भारत एक विकसित राष्ट्र होईल हे प्रत्येक नागरिकांचे स्वप्न असले पाहिजे, आणि त्यासाठी प्रत्येकाने आपल्या क्षेत्रामध्ये प्रामाणिकपणे काम केले पाहिजे असे मत निवृत्त प्रशासकीय अधिकारी आणि चाणक्य मंडल संस्थेचे संस्थापक अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.

नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'भारत 2047 आणि मी' या विषयावरील व्याख्यानमालेत अविनाश धर्माधिकारी बोलत होते. संस्थेचे वक्ता विभाग प्रमुख दीपक मेहेंदळे, विश्वस्त अमेय सप्रे, प्रीतम थोरवेआदि यावेळी उपस्थित होते. अविनाश धर्माधिकारी म्हणाले, तुम्ही कोणत्याही क्षेत्रामध्ये काम करत असाल तेंव्हा काम करताना तुमच्यातील भारत मातेचा कार्यकर्ता कायम जिवंत राहिला पाहिजे. आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केवळ त्या पदावर आहेत म्हणून त्यांचेच केवळ भारत विकसित राष्ट्र असावा हे स्वप्न असले नाही पाहिजे. तर प्रत्येक नागरिकाचे असे स्वप्न असले पाहिजे की माझा भारत हा विकसित राष्ट्र झाला पाहिजे आणि त्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करत राहील. प्रशासन हे देशसेवेचे माध्यम आहे. त्यातून राष्ट्रसेवा आणि विकासाला गती दिली पाहिजे. अमेरिका हे राष्ट्र केवळ अब्राहम लिंकन यांच्यापासून ते डोनाल्ड ट्रम्प यांच्यापर्यंत अध्यक्षांनी घेतलेल्या निर्णयामुळे सुपर पॉवर झालेला नाही तर तेथील प्रत्येक नागरिकाच्या प्रयत्नामुळे अमेरिका विकसित राष्ट्र झाले आहे. अशाच प्रकारे भारत विकसित राष्ट्र होण्यासाठी भारताचा प्रत्येक नागरिकांनी प्रामाणिकपणे हातभार लावला पाहिजे. आधुनिक काळातही भारत एक विकसित राष्ट्र होण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि सेमी कंडक्टर यांसारख्या क्षेत्रांमध्ये आपण अग्रस्थानी राहिले पाहिजे तरच देश हार्डपॉवर आणि सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये भविष्यात पुढे राहील असा विश्वास अविनाश धर्माधिकारी यांनी यावेळी व्यक्त केला. प्रस्ताविकापर भाषणात अमेय सप्रे म्हणाले, देश प्रथम हे आमच्या संस्थेचे कायम ध्येय ठेवलेले आहे आणि त्यानुसारच आम्ही मार्गक्रमण करीत आहोत. त्यामध्ये प्राधान्याने आम्ही पॉलिसी रिफॉर्म करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत.

# गुंतवणूकदारांसाठी चालना देण्यासाठी कोटक सर्व्हिसेस फंड सुरू

**मुंबई (दै. संध्या) :**

कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड ("KMAMC"/"कोटक म्युच्युअल फंड") ने कोटक सर्व्हिसेस फंड या सेवा-आधारित थीमवर आधारित ओपन-एंडेड इक्विटी योजनेची घोषणा केली आहे. ही नवीन फंड ऑफर (NFO) गुंतवणूकदारांना भारताच्या मुख्य वाढीच्या इंजिनमध्ये – सेवा क्षेत्रात – गुंतवणुकीची संधी देते. सेवा क्षेत्र देशाच्या GVA (ग्रॉस व्हॅल्यू ॲडेड) मध्ये 55% योगदान देते आणि देशातील 31.5% कामगारांना1 रोजगार देते. ग्राहक सेवा, दूरसंचार, आरोग्यसेवा, लॉजिस्टिक्स, वित्तीय सेवा, आयटी, ऊर्जा आणि तेल व वायू यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये जलद वाढ होत आहे. त्यामुळे भारताची सेवा अर्थव्यवस्था दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी* अनेक संरचनात्मक वाढीचे घटक उघड करत आहे. कोटक सर्व्हिसेस फंड ही बहुआयामी संधी ग्रोथ ॲट रिझनेबल प्राइस (GARP) आणि BMV फ्रेमवर्क (बिझनेस, मॅनेजमेंट,व्हॅल्यू) या शिस्तबद्ध गुंतवणूक धोरणाद्वारे साध्य करण्याचा प्रयत्न करेल. हा फंड सर्व प्रकारच्या मार्केट कॅपिटलायझेशनमध्ये गुंतवणूक करेल, ज्यामध्ये मजबूत रोख प्रवाह, स्केलेबल मॉडेल्स आणि दीर्घकालीन कंपाउंडिंग क्षमता असलेल्या गुणवत्तापूर्ण व्यवसायांवर लक्ष केंद्रित केले जाईल. निलेश शाह, व्यवस्थापकीय संचालक, कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड यांनी सांगितले, "भारताची सेवा अर्थव्यवस्था संरचनात्मक बदलातून जात आहे. वाढती उत्पन्ने, डिजिटल स्वीकार आणि शहरीकरण यामुळे भारतीयांच्या उपभोग, व्यवहार आणि आवश्यक सेवांमध्ये प्रवेश करण्याच्या पद्धती बदलत आहेत. कोटक सर्व्हिसेस फंड द्वारे आम्ही अशा संधींना पकडणारे पोर्टफोलिओ तयार करण्याचा प्रयत्न करत आहोत, ज्यामुळे गुंतवणूकदारांना दीर्घकालीन मूल्य मिळेल."

रोहित टंडन, कोटक सर्व्हिसेस फंडचे फंड मॅनेजर म्हणाले, "सेवा-आधारित थीममध्ये उपभोग-आधारित आणि निर्यात-आधारित विभागांचा समावेश असल्यामुळे स्थिरता आणि वाढ दोन्ही मिळतात. आमच्या दृष्टीने, सेवा क्षेत्र हे भारताच्या बाजारपेठेत लवचिकता आणि विस्तारक्षमता यांचे सर्वात आकर्षक संयोजन आहे. कोटक सर्व्हिसेस फंडमध्ये आमचे पोर्टफोलिओ बांधणी अशा कंपन्यांकडे झुकलेले असेल ज्यांनी नफा टिकवून ठेवण्याची क्षमता दाखवली आहे, व्यवसाय मॉडेल्स सुधारले आहेत आणि भांडवल शिस्तबद्धपणे वापरले आहे. आमचा गुंतवणुकीवरील विश्वास असा आहे की अशा कंपन्यांची शिस्तबद्ध निवड गुंतवणूकदारांसाठी स्थिर आणि दीर्घकालीन संपत्ती निर्मितीत रूपांतरित होऊ शकते."

कोटक सर्व्हिसेस फंड अशा काळात सुरू होत आहे जेव्हा भारतातील सेवा-आधारित उद्योग घरगुती, व्यवसाय आणि संस्थांच्या कार्यपद्धतींमध्ये आमूलाग्र बदल घडवत आहेत. ग्राहकांच्या अपेक्षा बदलत असताना आणि सेवा वितरणाचे मॉडेल्स अधिक प्रगत होत असताना, या क्षेत्रात अशा उद्योगांची जोरदार वाढ होत आहे जे विशेषीकरण, तंत्रज्ञान-सक्षम प्रक्रिया आणि कार्यक्षम शिस्त यांचा वापर करून प्रभावीपणे विस्तार करत आहेत. एनएफओमध्ये किमान ₹1000 गुंतवणूक करता येईल आणि ऑफर कालावधीत त्यानंतर कोणतीही रक्कम गुंतवता येईल. ही योजना अशा गुंतवणूकदारांसाठी योग्य आहे जे सेवा-आधारित व्यवसायांमध्ये गुंतवणूक केलेल्या विविधीकृत पोर्टफोलिओद्वारे दीर्घकालीन भांडवली वाढ शोधत आहेत, जसे की योजनेच्या उत्पादन उपयुक्तता प्रकटीकरणांमध्ये नमूद केले आहे.


**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई - निविदा सूचना

अधीक्षक अभियंता, महावितरण, गणेशखिंड शहर मंडल, पुणे यांचे तर्फे मान्यताप्राप्त व नोंदणीकृत ठेकेदारांकडून कार्यक्षेत्रातील 22 केव्ही वीज उपकेंद्रांच्या बिघाड दुरुस्तीच्या (Breakdown Maintenance) कामासाठी एजन्सी नामिकाप्रविष्ठ (Empanelment) करण्यासाठी ई-निविदा मागवण्यात येत आहेत. **निविदा क्रमांक: 18/2025-2026** असून, सदर निविदा **दि. 11 फेब्रुवारी 2026 रोजी रात्री 23:55 वाजेपर्यंत** उपलब्ध असून **निविदा भरण्याची अंतिम तारीख 12 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 11:00 वाजेपर्यंत आहे.** निविदेच्या अधिक माहितीसाठी https://etender.mahadiscom.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

PRO/PZ/216/2025-26

अधीक्षक अभियंता,
गणेशखिंड शहर मंडल, पुणे



**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे- ४११ ००१**

**दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४८५ व २६१२२४१४ फॅक्स क्र.०२०/२६१२२४८५**

**Web- www.mahapwd.gov.in & e-mail- pune.ee@mahapwd.gov.in**

## ई-निविदा सूचना क्रमांक ६९ सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे १ (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२४८५/२६१२२४१४) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/ इमा-२. दिनांक २७/९/२०१८ व शासन सा. बां. विभाग मुंबई परिपत्रक क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २२/१०/२०१८ आणि शासन सा. बां. विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीएटी-२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २०/५/२०२१ आणि शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२, दिनांक ३१/०८/२०२३ आणि शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/ प्र. क्र. १०४/इमा-२, दिनांक १४/२/२०२५ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गामध्ये नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारांकडून रू. ५०.०० लक्षपेक्षा जास्त व रू. १००.०० लक्ष पर्यंतच्या अंदाजपत्रकीय किंमतीचे कामांसाठी बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा विक्री कालावधी तसेच सादर करावयाचा कालावधी | :- | दिनांक ११/०२/२०२६ सकाळी १०.०० वा.ते दिनांक २०/०२/२०२६ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत. |
| ऑनलाईन ई निविदा उघडणेचा दिनांक व वेळ | : | दिनांक २३/०२/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

1. web : www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. http://mahatenders.gov.in

(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल.)

सही/-
(प्रशांत शं. खैरमोडे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पुणे ४११ ००१.

विमाका/पुणे/जाहि./२९८/२०२५-२६

# ‘काळा घोडा फेस्टिव्हल २०२६’ मध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळेला प्रथम क्रमांक

## थेरगाव मनपा शाळेने सादर केलेले “मानवी विचारांचे रोलरकोस्टर” या विषयावरील इन्स्टॉलेशन ठरले लक्षवेधी

पिंपरी (दै. संध्या) :

मुंबई येथील प्रतिष्ठित काळा घोडा फेस्टिव्हल २०२६ अंतर्गत आयोजित चिल्ड्रन्स इन्स्टॉलेशन विभागासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चार शाळांची निवड झाली होती. या विभागातील विजेत्या शाळांची यादी नुकतीच जाहीर करण्यात आली असून त्यामध्ये महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण प्राथमिक कन्या शाळा, थेरगाव या शाळेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेत पहिल्यांदाच महापालिकेच्या शाळेला प्रथम पारितोषिक मिळाले आहे.



पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर तसेच कला नोडल अधिकारी श्रीकांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

थेरगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी “मानवी विचारांचे रोलरकोस्टर” या विषयावर सादर केलेले इन्स्टॉलेशन परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेणारे ठरले. टाकाऊ वस्तूंचा सर्जनशील वापर करून मानवी मनाचा वेग, भावनांची गुंतागुंत आणि आत्मसंयम यांचे प्रभावी प्रतीकात्मक दर्शन या मॉडेलमध्ये घडवण्यात आले आहे. हे मॉडेल सर्वोत्तम ठरले असून थेरगाव शाळेला प्रथम क्रमांक मिळाला आहे. या यशामुळे मनपा शाळांनी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रासह विविध राज्यांतील अनेक नामांकित व खासगी शाळांनी सहभाग नोंदवला होता. अशा स्पर्धात्मक वातावरणात महापालिकेच्या शाळेने मिळवलेले हे यश विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता, कल्पकता आणि मार्गदर्शनाची पावती देणारे ठरले आहे.

या इन्स्टॉलेशनची संकल्पना व निर्मिती कला शिक्षिका मुक्ता पुसाळकर-धोंगडे यांनी केली असून, त्यांना अंशकालीन शिक्षिका स्वाती मदने व दिपाली नवले यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमात सानिका पवार, श्रावणी महापुरे, दिपाली पांडगुळे, अनुजा टोमके, प्रिया होळकर, हुमेरा शेख, यशोदा राठोड, किशोरी वाबळे व समिक्षा डींगरे या विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदवला. स्पर्धेमध्ये मिळालेल्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी दौंडकर यांच्यासह शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

‘मानवी विचारांचे रोलरकोस्टर’ या संकल्पनेवर आधारित इन्स्टॉलेशनची कलात्मक मांडणी, प्रतीकात्मकता आणि भावनिक आशयामुळे परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. यामध्ये सायकलच्या चाकांमध्ये धावणारा घोडा विचारांची ऊर्जा आणि इच्छाशक्ती दर्शवतो, तर दोरी पकडून उभी असलेली मुलगी आत्मसंयम आणि विवेकाचे प्रतीक ठरते. वेस्ट मटेरियलमधून घडवलेले चेहरे, मानवी आकृती आणि त्रिमितीय रचना जीवनातील संघर्ष, अनुभव आणि मानसिक चढ-उतार अधोरेखित करतात. विचारांवर नियंत्रण ठेवून अनुभवांना योग्य दिशा देण्याचा संदेश देणाऱ्या या इन्स्टॉलेशनमुळे विद्यार्थ्यांना स्पर्धेत मानांकन मिळाले असून, त्यांच्या सर्जनशीलतेने राष्ट्रीय स्तरावर कौतुकास पात्र ठरले आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळवणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांची कल्पकता, मेहनत आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाले आहे. महापालिकेच्या शाळांमधील गुणवत्ता आणि संधी योग्य दिशेने दिल्यास विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देखील सहज यश मिळवू शकतात, याचे हे उत्तम उदाहरण आहे.
>
> – विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका
>
> काळा घोडा फेस्टिव्हलसारख्या प्रतिष्ठित स्पर्धेत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळेला प्रथम पारितोषिक मिळणे ही ऐतिहासिक बाब आहे. विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंमधून साकारलेली कलाकृती ही त्यांच्या विचारक्षमतेची आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोनाची साक्ष देणारी आहे. महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना अशा संधी देत राहणार असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण विभाग सातत्याने प्रयत्नशील राहील.
>
> – ममता शिंदे, उपायुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जयहिंद पॉलीटेक्रिक संघ विजेता, पिंपरी चिंचवड पॉलिटेक्रिक संघ उपविजेता

पिंपरी, पुणे (दैनिक संध्या) : इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन इंटर झोनलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकच्या मुलांच्या संघावर नारायणगाव, कुरण येथील जयहिंद पॉलीटेक्निक संघाने १४ धावांनी विजय मिळवला. संघ प्रमुख वरद सराफ, जय तारक, जय शर्मा यांच्या अष्टपैलू खेळामुळे हे यश मिळाले. अंतिम सामन्यात गोलंदाज मयूर धांडे, वरद सराफ यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून उत्कृष्ट गोलंदाजी केली. वाघोली येथील भिवराबाई सावंत पॉलिटेक्निक येथे आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धेत डी १ झोन मधील पॉलिटेक्निकच्या १४ संघांनी सहभाग घेतला होता. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक (पीसीपी) संघाला संघ व्यवस्थापक एस. एस. धानूरे, सोमनाथ खेडेकर, रुपेश पवार, प्रविण नाईक क्रीडा समन्वयक, सुनील जगताप, किशोर गव्हाणे, लक्ष्मी थरकुडे प्राचार्य डॉ. विद्या बॅकॉड यांनी मार्गदर्शन केले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### नवीन उड्डाणपूलाला मा. अजितदादा पवार साहेब’ नाव द्यावे

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी येथील नव्याने उभारण्यात येणाऱ्या डेअरी फार्म उड्डाणपूलाला ‘लोकप्रिय दिवंगत उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार साहेब उड्डाणपूल’ असे नाव देण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रभाग क्र. २१ मधील सर्व नगरसदस्यांच्या वतीने डब्बू आसवानी यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांकडे केली आहे. महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय दिवंगत उपमुख्यमंत्री तसेच पिंपरी-चिंचवड शहराचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे अजितदादा पवार साहेब यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी दूरदृष्टीपूर्ण व मोलाचे योगदान दिले असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. पाणीपुरवठा योजना, रस्ते व वाहतूक व्यवस्था, औद्योगिक विकास, नागरी पायाभूत सुविधा, जलनिस्सारण व्यवस्था तसेच महापालिकेची आर्थिक शिस्त व बळकटीकरण यांसाठी त्यांनी घेतलेले निर्णय शहराच्या प्रगतीसाठी दिशादर्शक ठरले, असेही निवेदनात म्हटले आहे. त्यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका एक सक्षम, आर्थिकदृष्ट्या सबळ व औद्योगिकदृष्ट्या प्रगत महानगरपालिका म्हणून उभी राहिली असून, शहराला स्वतंत्र व सशक्त औद्योगिक आणि नागरी ओळख मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी येथील नवीन डेअरी फार्म उड्डाणपूलाला त्यांच्या नावाने नामकरण केल्यास त्यांच्या कार्याची आठवण कायमस्वरूपी जपली जाईल, अशी भावना व्यक्त करण्यात आली आहे.

## महायुतीत असूनही रिपब्लिकन पक्षावर अन्याय

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर तसेच उपमहापौरपदी डावलल्यानंतर महायुतीत असूनही रिपब्लिकन पक्षावर अन्याय होत असल्याची भावना शहराध्यक्ष तथा नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांनी व्यक्त केली आहे. पुण्यात भाजपाने मोठ्या मनाने रिपाईला उपमहापौर पद देऊन युतीचा धर्म पाळला. त्याप्रमाणे आता पिंपरी चिंचवड मध्ये भाजपाने स्थायी समितीचे सभापती पद देऊन अन्याय दूर करावा अशी मागणी वाव्हळकर यांनी केली आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) हा लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये प्रामाणिकपणे भारतीय जनता पार्टी व महायुतीसोबत काम करत आला आहे. मात्र लोकसभा व विधानसभेमध्ये कोणतीही जागा मिळालेली नसतानाही आंबेडकरी समाज आजही महायुतीसोबत ठामपणे उभा आहे. असे असताना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये रिपब्लिकन पक्षावर होत असलेल्या दुर्लक्षामुळे पक्षाच्या गोटात तसेच आंबेडकरी समाजात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला १२८ पैकी पाच जागा देण्यात आल्या होत्या. त्यापैकी प्रभाग क्रमांक २५ मधून कुणाल वाव्हळकर (शहराध्यक्ष) आणि प्रभाग क्रमांक १६ मधून धर्मपाल तंतरपाळे हे दोन उमेदवार निवडून आले.

## साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही भरता येणार मालमत्ता कर




पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून शहरात मालमत्ता कर वसुलीची मोहीम सुरू आहे. चालू आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आता केवळ दोन महिने शिल्लक राहिले आहेत. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांना कर भरण्यास अधिक सुविधा मिळाव्यात, यासाठी महापालिकेचे मुख्य कार्यालय तसेच शहरातील १८ विभागीय कर संकलन कार्यालये शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत.

पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्ताधारकांसाठी कर भरण्यासाठी १८ विभागीय कर संकलन कार्यालये कार्यान्वित असून, या ठिकाणी तसेच ऑनलाईन पद्धतीने कर भरण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. कर संकलन विभागाच्या वतीने थकबाकीदारांविरोधात कठोर कारवाई सुरू असून, थकबाकीदारांवर मालमत्तांची जप्ती करणे तसेच नळ कनेक्शन खंडित करण्याच्या कारवाया केल्या जात आहेत. कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी आपला थकीत मालमत्ता कर वेळेत भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व संकलन विभागाच्या वतीने विविध माध्यमांतून नागरिकांना मालमत्ता कर भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांसाठी ऑनलाईन कर भरणा करण्याची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. शहरातील करदात्यांनी मालमत्ता कराचा भरणा करून शहराच्या विकासामध्ये हातभार लावावा.
>
> — तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका
>
> सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी तसेच शनिवार आणि रविवार या कालावधीत सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत सर्व १८ विभागीय कर संकलन कार्यालयांतील कॅश काऊंटर सुरू असणार आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी कर भरण्याची वेळ वाढविण्यात आली असून, दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत ही सुविधा उपलब्ध असणार आहे. या सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा.
>
> — सचिन पवार, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

## एमईएस एम्प्लॉईज को - ऑप. क्रेडिट सोसायटी १०० वर्षे सेवा हे गौरवशाली

पिंपरी (दै. संध्या) :

- मेजर जनरल सुधीर ठाकूर
- एमईएस एम्प्लॉईज को - ऑप. क्रेडिट सोसायटी ली. चा शतक महोत्सव संपन्न



स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये १९२४ मध्ये मिलिटरी इंजीनियरिंग सर्व्हिस (एमईएस) या केंद्र सरकारच्या संस्थेची स्थापना झाली. या नंतर दोन वर्षांनी १९२६ मध्ये एमईएस एम्प्लॉईज को - ऑप. क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेची स्थापना झाली. एमईएसच्या निवडक कामगारांनी एकत्र येऊन सुरू केलेली ही संस्था सुमारे १० हजार पेक्षा जास्त सभासदांना एकत्र करून सलग १०० वर्षे सुलभ पद्धतीने कर्ज वितरण देऊन सेवा देत आहे हे एमईएस साठी खूप गौरवशाली आहे. या सोसायटीने सीबीएस ही अत्याधुनिक संगणक प्रणाली सुरू केली आहे. यामुळे आणखी कार्यक्षमता वाढून उत्तम सेवा सभासदांना मिळेल असा विश्वास मेजर जनरल, मुख्य अभियंता दक्षिण कमांड सुधीर ठाकूर यांनी व्यक्त केला. पुणे येथील एमईएस एम्प्लॉईज को - ऑप. क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेच्या शतक महोत्सव वर्षानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सुधीर ठाकूर बोलत होते. यावेळी सीआरसीएस, केंद्र सरकार, नवी दिल्ली सहसचिव मोनिका खन्ना, आयडीएसई, सीई पुणे झोन व्ही. पी. श्रीवास्तव, एमईएस सोसायटीचे अध्यक्ष विलास भोंडवे, सचिव राजेश टिळेकर, उपाध्यक्ष प्रतिभा शिंदे, सहसचिव दीपेश नाटक, मुंबई शाखा सचिव शेखर व्यवहारे, संचालक संतोष आराख, निलेश रोकडे, ललित पुंडकर, सीईओ सी. एन. तोंडे तसेच कर्नल सुमित वशिष्ठ, कर्नल विकास सिंग सेनगर, कर्नल सत्य नारायण, पीसीडीए स्वाती सुर्वे, उमेश कुमार, अभिजित पॉल, के. प्रसाद, विनय प्रताप, देवेंद्र कुमार, अंगद तिवारी, कामेश्वर प्रसाद, सुनील कागे, धीरेंद्र सिंग, दिलीप कुमार, पी. एस. राव आदी उपस्थित होते.

यावेळी लकी ड्रॉ मध्ये विजेत्या झालेल्या शुभांगी टिळेकर, आरती वायकर, अनुजा मेढेकर, मंगल टिळेकर आणि रिजवाना शेख या भगिनींना पैठणी देऊन गौरविण्यात आले.

तत्पूर्वी रास्ता पेठ, पुणे येथील एमईएस एम्प्लॉईज को - ऑप क्रेडिट सोसायटीच्या कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण करण्यात आले आणि केक कापून शतक महोत्सव साजरा करण्यात आला.

सोसायटीचे अध्यक्ष विलास भोंडवे यांनी स्वागत करताना सांगितले की, केंद्र सरकारच्या संरक्षण विभागातील मिलिटरी इंजीनियरिंग सर्व्हिस मधील देशातील १३ राज्यातील अधिकारी व कर्मचारी या क्रेडिट सोसायटीचे सभासद आहेत. अवघ्या एक रुपये सभासद फी पासून सुरू झालेली ही संस्था सलग १०० वर्षे सेवा देऊन १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल दरवर्षी करत आहे. हे सभासदांनी संचालक मंडळावर दाखविलेल्या विश्वासामुळे शक्य झाले आहे. पुढील काळात देखील सभासदांना आणखी उत्कृष्ट सेवा देण्याची हमी देखील देत आहे.



## विकासकामांना गती देण्यासाठी भाजपा नगरसेवक आक्रमक

पिंपळे सौदागर (दै. संध्या) :

प्रभाग क्रमांक २८ मधील विविध विकासकामांचा सखोल आढावा घेण्यासाठी भाजपा नगरसेवक शत्रुघ्न काटे तसेच नगरसेविका अनिता काटे आणि नगरसेविका कुंदा भिसे यांच्या उपस्थितीत मॅरेथॉन आढावा बैठक व प्रत्यक्ष पाहणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. निवडणुकीदरम्यान नागरिकांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी तिन्ही लोकप्रतिनिधी ॲक्शन मोडमध्ये असून, विकासकामांना गती देण्यावर विशेष भर देण्यात आला. आढावा बैठकीदरम्यान काही विकासकामांतील दिरंगाईबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत नगरसेवक शत्रुघ्न काटे आणि दोन्ही नगरसेविकांनी संबंधित पालिका अधिकाऱ्यांना थेट धारेवर धरले. कामांचा दर्जा, विलंबाची कारणे आणि अपूर्ण कामांबाबत सविस्तर स्पष्टीकरण मागत, ठराविक कालमर्यादेत कामे पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले.

# अजितदादा हे सामान्य माणूस आणि पत्रकारांप्रती संवेदना असलेले नेते होते

## नंदकुमार सातुर्डेकर यांचे प्रतिपादन



पिंपरी (दै. संध्या) :

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची बारीक माहिती, मिश्कील तितकाच स्पष्ट वक्ता स्वभाव, जनसामान्यांमध्ये मिसळणारे दादा आपल्यातून गेले यावर विश्वासच बसत नाही. सामान्य माणूस आणि पत्रकारांप्रती संवेदना असलेला नेता आपल्यातून गेला आहे. अशा भावना ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजलीपर सभेत व्यक्त केल्या.

पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने प्रा रामकृष्ण मोरे नाट्यगृहात सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सातुर्डेकर यांनी अजितदादांच्या अनेक पैलूंचे दर्शन घडवले.

जनसामान्यांमध्ये मिसळणारा नेता म्हणून मला नेहमीच अजित पवार यांचे अप्रूप वाटत आले असे सांगून सातुर्डेकर म्हणाले की, मंत्री आले की प्रचंड सुरक्षा व्यवस्था असते. मात्र ही सुरक्षा झुगारून देऊन जनसामान्यात मिसळणारा नेता अशी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ओळख होती. वेळोवेळी पिंपरी चिंचवड शहरवासीयांना याचा प्रत्यय आला.सामान्यातल्या सामान्य माणसाला भेटणारा नेता अशी अजित पवार यांची ओळख होती. दोन वर्षांपूर्वी राष्ट्रवादीची जन सन्मान यात्रा निगडीत आली असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंक रिक्षातून प्रवास केला. पुरुषांपेक्षा महिला स्मूथ रिक्षा चालवतात अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. त्यावेळी महिला रिक्षाचालकांच्या चेहऱ्यावर दिसलेले समाधान असाधारण असे होते. असे सातुर्डेकर म्हणाले.

सन 1992 मध्ये बारामती लोकसभा मतदार संघातून विजयी झाल्यापासून अजित पवार यांनी पिंपरी चिंचवडचे नेतृत्व केले. तत्कालीन महापौर विलास लांडे, मंगलाताई कदम यांच्या काळात अजितदादांशी जवळून भेटता आले. पत्रकार व कार्यकर्ता म्हणून त्यांना अनेकदा भेटलो. शहरात भेटी दरम्यान त्यांनी सर्वसामान्यांचे प्रश्न नेहमीच ऐकून घेतले. कोणीही साधी चिठ्ठी दिली तरी भाषणात ते त्याचा उल्लेख करायचे आणि तो प्रश्न तडीस नेण्याची आश्वासन देऊन पूर्णही करायचे. वैयक्तिक प्रश्नाबाबत तो अर्ज स्वीय सहाय्यकाकडे देऊन प्रश्न मार्गी लावायचा प्रयत्न करायचे. एखादे काम होणार नसेल तर तोंडावरच सांगून टाकायचे.

पत्रकारांप्रती अजितदादा अतिशय संवेदनशील होते असे सांगताना सातुर्डेकर म्हणाले की पत्रकारांनी आडवेतिडवे आणि टार्गेट करणारे प्रश्न विचारले की दादा अचूक ओळखायचे. 'एक मिनिट' म्हणत.. त्या पत्रकाराला थांबवत चिडायचे सुद्धा. पण शहरातील पत्रकारांप्रती अजित पवार यांची संवेदनशीलता वेळोवेळी दिसून आली. मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या तोंडावर शाई फेकल्याच्या प्रकारानंतर पिंपरी चिंचवड मध्ये कोणी मंत्री आल्यानंतर पत्रकारांना त्यांची भेट घेणे मुश्किल झाले होते. त्यामुळे विशेषतः वृत्तवाहिन्यांच्या पत्रकारांची कोंडी झाली होती. याबाबत प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृह येथे पत्रकारांनी अजित पवार यांची भेट घेतली असता त्यांनी पोलीस आयुक्तांना बोलवून आम्ही आल्यानंतर पत्रकारांशी बोलायचं का नाही ते ठरवू, पण त्याआधी तुम्ही त्यांना अडवू नका असे स्पष्ट निर्देश अजित पवार यांनी दिले होते. त्यानंतर महापालिका निवडणुकीच्या तोंडावर पिंपरीतील खराळवाडी येथील एका हॉटेलमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेच्या वेळी अनेक पत्रकारांचे खिसे तपासले गेले. बॅगा तपासल्या गेल्या. त्याबाबत नापसंती व्यक्त करत पत्रकारांनी बहिष्काराचे अस्त्र उगारले. राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल आणि माजी उपमहापौर डब्बू आसवाणी यांनी दादांच्या कानावर ही गोष्ट घातली. तेव्हा दादा स्वतः पत्रकारांकडे आले.

'दादा,आपण मागे पोलीस आयुक्तांना आदेश देऊनही पत्रकारांना त्रास दिला जात आहे 'याकडे पत्रकारांनी लक्ष वेधले असता 'पोलिसांनी असे करणे अतिशय चुकीचे आहे, मी जेव्हा येणार असेल तेव्हा असे अजिबात चालणार नाही असे आदेश देतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलतो.' असे आश्वासन अजित पवार यांनी दिले.

'दादा तुम्ही विरोधी पक्षातच बरे होतात यांना थोडा वचक होता' अशी कमेंट केली असता 'नाही आता मी देवेंद्रला सांगून गृहमंत्री पदच माझ्याकडे घेतो 'अशी मिस्कील टिपणी त्यांनी केली. अशी आठवण सातुर्डेकर यांनी सांगितली.

> राज्यात काँग्रेस -राष्ट्रवादी आघाडीचे सरकार असतानाचा एक किस्सा सांगताना सातुर्डेकर म्हणाले की, त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी महापौर आझमभाई पानसरे हे काँग्रेसच्या वाटेवर होते. त्यांना थांबविण्यासाठी राष्ट्रवादीने ग्राहक कल्याण सल्लागार समिती अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती केली. त्यावेळी त्यांच्यासोबत मी आणि ज्येष्ठ पत्रकार उद्धव भडसाळकर मंत्रालयात गेलो होतो. पानसरे हे आग्रह करत असतानाही आम्ही बाहेरच थांबलो. पानसरे यांनी पुष्पगुच्छ देऊन अजित पवार यांचा सत्कार केला. त्यावेळी अजितदादा यांनी 'आपण कोण कोण आला आहात ?' असे पानसरे यांना विचारले.त्यावर त्यांनी 'सातुर्डेकर आणि भडसाळकर दोन पत्रकार माझ्यासोबत आले आहेत' असे सांगितले. त्यावर अजितदादांनी शिपाई आणि क्लार्कला सांगून आम्हास बोलून घेतले. दादांच्या कार्यालयात गेल्यावर 'अरे पत्रकार मित्रांनो, एवढे का आपले संबंध दुराव्याचे आहेत, तुम्ही इतक्या लांब घेऊन बाहेरच थांबलात.' असे प्रेमाचा ओलावा असणारे उद्गार त्यांनी काढले. त्यावर 'दादा शहरात आलात की आपण भेटतोच.तुम्हाला आणि आझमभाईना काही बोलायचे असेल म्हणून बाहेर थांबलो' असे मी म्हणालो. त्यावर 'माझे आत आणि बाहेर वेगळे काहीच नसते' असे अजितदादा म्हणाले. आमच्याशी बोलत त्यांनी पाच मिनिटात अनेक फायलींचा निपटारा केला . 'दादा पाच मिनिटात किती फायलींचा निपटारा केलात' मी म्हणालो. त्यावर अजितदादा हसत म्हणाले,' हा आमचा मुख्यमंत्री पृथ्वीराज बाबा नुसता घाबरतो नुसता घाबरतो, फायलींवर सह्या करायच्या म्हटले की याच्या हाताला लकवा भरतो. लोकांची काम करताना इतकं काय घाबरायचं मला कळत नाही' असं पटकन दादा बोलून गेले. परत जीभ चावत 'मी खरंतर ठरवतो वंगाळ बोलायचं नाही पण तोंडातून शब्द जातात .' असे म्हणत ते दिलखुलासपणे हसले. त्यांचा हा मनमोकळा स्वभाव नेहमीच काही ना काही बातम्या देऊन जायचा. म्हणूनच अजितदादा आले की पत्रकारांच्या उड्या पडायच्या. हमखास चांगली काही ना काही बातमी देणारे दादा आता कधीच भेटणार नाहीत ही वेदना पत्रकारांच्याही अंतःकरणात आहे. अशा भावना सातुर्डेकर यांनी व्यक्त केल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### लांडेवाडी येथे ग्रामस्थांच्या शोकसभेत दादांच्या आठवणींनी सर्वच गहिवरले

मंचर (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार हे सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. दादांच्या निधनाने महाराष्ट्र पोरका झाला, त्यांच्यासारखा दूरदृष्टी असलेला नेता पुन्हा होणे नाही. अशा शब्दात सर्वपक्षीय नेते, सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. दादांच्या आठवणी सांगताना अनेकांचा कंठ दाटून आला. येथील ग्रामपंचायत प्रांगणात स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर झालेल्या शोकसभेत स्व. अजितदादा पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील यांनी शोकसभेत दादाच्या आठवणी सांगत मैत्री कशी असावी याचे आपल्या शैलीत उदाहरण दिले शिवसेना उपतालुका प्रमुख बबन गव्हाणे तंटामुक्त अध्यक्ष खंडेराव आढळराव पाटील सरपंच संगीता शेवाळे पाटील रामदास आढळराव पाटील उत्तम गव्हाणे ग्रामपंचायत सदस्य समीर ढेरंगे दादाभाऊ निसाळ चेअरमन शंकर शेवाळे पाटील भावजी आढळराव पाटील धनेश शेवाळे पाटील व ग्रामस्थ युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते म्हाडा चे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी शोकसभेत दादा सोबतच्या आठवणी सांगितल्या. या शोकसभेत अनेक कार्यकर्त्यांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त केले.

### शिरूरमध्ये श्रीमद् भागवत कथामृत सप्ताहाचे भव्य आयोजन

शिरूर (दैनिक संध्या) : त्रिकाल संध्या प्रचार संघटनेचा पुढाकार; पंडित डॉ. काशिनाथ मिश्रा यांचे कथाकथन शिरूर शहरात भक्ती, संस्कार व अध्यात्मिक वातावरण निर्माण करण्यासाठी त्रिकाल संध्या प्रचार संघटनेच्या वतीने श्रीमद् भागवत कथामृत सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक उपक्रम दि. ३ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत शिरूर नगरपरिषद मंगल कार्यालय, शिरूर बसस्थानकाजवळ दररोज सायंकाळी ४.३० ते रात्री ८.०० या वेळेत होणार आहे. या कथामृताचे कथाकथन सुप्रसिद्ध भागवताचार्य पंडित डॉ. काशिनाथ मिश्रा करणार असून त्यांच्या ओघवत्या, अभ्यासपूर्ण व प्रभावी वाणीमधून श्रीमद् भागवताचा अमृतरस भाविकांना अनुभवता येणार आहे. या सात दिवसीय सप्ताहात प्रभू श्री जगन्नाथ कलशयात्रा, प्रभात फेरी, हरीनाम संकीर्तन, शंखनाद, त्रिकाल संध्या, प्रभू श्री जगन्नाथ पूजा, श्रीमद् भागवत पठण तसेच महाप्रसाद अशा विविध भक्तीमय व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना पंडित डॉ. काशिनाथ मिश्रा म्हणाले की, "भारत ही देवभूमी आहे. धर्म ही समाजाला योग्य दिशा देणारी महान शक्ती आहे. अनेक संकटांवर मात करूनही सनातन धर्म आजही टिकून आहे. ही आध्यात्मिक परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने विश्व सनातन संस्थेच्या माध्यमातून भागवत कथा घरोघरी पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू आहे." या पत्रकार परिषदेस आशा बारणे, दिलिप बारणे, अजिनाथ मालसुरे राजेंद्र डोंगरे, अशोक भोसले, महेंद्र परदेशी आदी मान्यवर उपस्थित होते. आयोजकांच्या वतीने शिरूर शहर व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कथामृताचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शिरूरमध्ये सात दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यामुळे शहरात भक्ती, अध्यात्म व संस्कारांची अनुभूती निर्माण होणार असून भाविकांसाठी हा सप्ताह पर्वणीसारखा उत्सव ठरणार आहे.

### पुरोगामी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. भाई के. डी चौधरी यांना विनम्र अभिवादन



हवेली (दैनिक संध्या) : पुरोगामी शिक्षण प्रसारक मंडळ सोरतापवाडी, नायगाव,पेठ या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष समाजवादी नेते स्व भाई के.डी चौधरी यांचा २४ वा स्मृतीदिन पुरोगामी माध्यमिक विद्यालय नायगाव येथे भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त आदर्श शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ रामभाऊ सातपुते गुरुजी, संस्थेचे सचिव रंगनाथ आप्पा कड विश्वस्त अनिल लोणकर, मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड पर्यवेक्षक राजीव चव्हाण उपस्थित होते.यावेळी भाईंच्या कार्याची माहिती सांगताना सातपुते गुरुजी म्हणाले आण्णांचा शिक्षणाप्रती दृष्टीकोन विशाल होता. त्या काळी मुलींना स्थानिक पातळीवर शिक्षण घेणे अवघड होते.हा विचार करुन ११ जुलै १९८३ साली भाई के.डी चौधरी यांनी गावात शाळा सुरू केली.अनेक अडचणींचा सामना करत आज हे विद्यालय गुणवत्तापूर्ण आणि भौतिक सुविधा युक्त भव्य असे उभे राहिले आहे.असे सांगितले.तर संस्थेचे सचिव रंगनाथ आप्पा कड यांनी सांगितले की आण्णांनी शाळेबरोबरच अनेक समाजोपयोगी कामे केली.रस्ते तयार केले.यशवंत सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पद भूषविले.सामुदायिक विवाह सोहळे केले. सार्वजनिक पीठाची गिरणी चालू केली.सर्व समाजाला एकत्र बांधण्याचे काम केले.तर जेष्ठ शिक्षक विठ्ठल ठोंबरे यांनी अण्णांच्या सहवासातील आठवणींना उजाळा देताना सांगितले की शाळेतील सर्व कर्मचारी यांना अतिशय आपुलकीने आपलेसे केले होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप थोपटे यांनी केले तर आभार प्रदर्शन रोहिदास बिचकुले यांनी मानले.सांस्कृतिक विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे नियोजन केले.

### यात्रेत कार्यक्रमांच्या रंगात वेळेच्या बंधनाने भंग; ग्रामस्थांमध्ये नाराजी

चाकण (दैनिक संध्या) : आचारसंहितेमुळे गावोगावी होणाऱ्या यात्रांमधील सांस्कृतिक कार्यक्रमांच्या रंगात वेळेचे बंधन आले आहे. ग्रामस्थांनी त्यामुळे नाराजी व्यक्त केली आहे. मिनी मंत्रालय अशी ओळख असलेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा प्रचार मोठ्या धुमधडाक्यात सुरू असून तब्बल नऊ वर्षांच्या कालावधीनंतर निवडणूक होत असल्याने दिग्गजांनी एकमेकांविरुद्ध दंड थोपटले आहेत. अनेक दिग्गज उमेदवार निवडणूक रिंगणात उतरल्याने पुन्हा एकदा ग्रामीण भागात निवडणुकीची रंगत पहायला मिळत आहे. त्यात आदर्श आचारसंहिता सुरू आहे. वर्षातून एकदा येणाऱ्या गावोगावच्या यात्रा म्हणजे केवळ धार्मिक कार्यक्रम नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा एक अविभाज्य भाग मानला जातो. दरवर्षी ग्रामदैवताच्या यात्रेनिमित्त तमाशा, लोकनाट्य, भारुड, ऑर्केस्ट्रा अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांमधून लोककलावंतांना चांगला रोजगार मिळतो. तसेच गावकऱ्यांना यात्रेनिमित्त येणाऱ्या पाहुण्यांना मनोरंजन म्हणून मेजवानी दिली जाते.

# धामणीला मानाच्या काठ्यांची मिरवणूक

**मंचर (दै. संध्या)**



धामणी (तालुका आंबेगांव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबाच्या यात्रेच्या दुसऱ्या दिवशी सोमवारी (२ फेब्रुवारी२६) पंचक्रोशीतील मानाच्या काठीच्या पारंपारिक मानकऱ्यांच्या नवसाच्या काठ्यांची मिरवणूक पारंपारिक वाद्याच्या गजरात सदानंदाचा येळकोटच्या जयघोषात भंडाऱ्याची मुक्तपणे उधळण करुन मोठ्या उत्साहात देवाच्या मानाच्या काठीचा सोहळा पार पडला. धामणीच्या माही पुनवेच्या यात्रेला पारंपारिक नवसाच्या व मानाच्या काठीचे मानकरी समस्त राजगुरु मंडळी (अवसरी खुर्द.ता आंबेगांव) पंचरास मंडळी (संविदणे ता.शिरुर) कांदळीकर (कवठे यमाई ता.शिरुर) वाळूंज पाटील (वाळूंजनगर लोणी) आगरकर मंडळी(पाबळ ता.शिरुर) नरके मंडळी (तळेगांव ढमढेरे. ता.शिरुर)समस्त पंचरास मंडळी (धामणी.लोणी.ता आंबेगांव) आल्हाट मंडळी (येडगांव ता.जुन्नर) घोडे मंडळी ( हाजी टाकळी. ता.शिरुर)येथील मानकऱ्यांनी सहभाग घेतला या सर्व आडनावांच्या कुळांनी या पारंपारिक सोहळ्याचा वारसा आजतगायत जतन केलेला दिसून येत होता.सध्याच्या गतीमान व बदलतं युग असताना व सर्वत्र भौतिक साधनाची आणि चारचाकी दुचाकी वाहनाची रेलचेल असताना धामणीच्या खंडोबाच्या माही पुनवेच्या यात्रेला अनेक कुटुंबे आपल्या कुटुंबियासह पारंपारिक बैलगाड्या जुंपून दरमजल प्रवास करुन येथे येतात याशिवाय देवाच्या महाद्वाराच्या शिखराला मानाची काठी टेकवण्यासाठी खांद्यावर काठी घेऊन पायी धामणीला येतात. मानाच्या काठीला चोहोबाजूनी रंगीबेरंगी कापडाची केलेली आकर्षक सजावट व काठीच्या टोकाला लावण्यात आलेले मोरपिसामुळे काठी सुशोभित दिसते.काठीच्या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या मानकऱ्यांची व भक्ताची निस्सीम श्रध्दा. परंपरा व देवाच्या नवसपूर्तीची भावना श्रेष्ठ असल्याचे यावेळी दिसून आले. मानाच्या काठीची मिरवणूक सकाळी आठ वाजता सुरुवात होऊन पहिला काठीचा मान अवसरी खुर्द येथील समस्त राजगुरु मंडळीच्या मानाच्या काठीला असतो.त्यांनी वाजतगाजत व पारंपारिक वाद्याच्या गजरात भंडाऱ्याची उधळण करून देवाची मानाची काठी "मल्हार"महाद्वाराच्या वरती असलेल्या देवाच्या अश्वाच्या शिल्पाला. टेकवण्यात आल्यानंतर सदानंदाचा येळकोटचा मोठा जयघोष करण्यात आला मिरवणूकीत फटाक्याची आतषबाजी करण्यात आली. मिरवणूकीत महिला भाविकांचा सहभाग लक्षणीय होता सर्व भाविक पिवळ्याधमक भंडाऱ्याने माखलेले होते.पंचक्रोशीतील भाविकांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. त्यानंतर पंचरास,घोडे,घोडेकर. कांदळकर,आगरकर,वाळूंज,नरके आल्हाट या परंपरागत कुळाच्या मानाच्या काठ्या वाजतगाजत येऊन माही पुनवेच्या मानाच्या काठीचा सोहळा शांततेत पार पडला. खंडोबा देवस्थान व ग्रामस्थांच्या वतीने काठीच्या मानकऱ्यांचा देवस्थान जिर्णोध्दार समितीचे अध्यक्ष प्रकाश पाटील जाधव व देवस्थानाचे सेवेकरी दादाभाऊ भगत,सुभाष तांबे,प्रभाकर भगत. धोंडीबा भगत,शांताराम भगत. पांडुरंग भगत,नामदेव भगत. सिताराम वाघे,ज्ञानेश्वर वाघे,सुरेश पवार यांनी मानाचा फेटा व पानफूल देऊन सत्कार करण्यात आला.

## मेदनकरवाडी येथील खंडोबा देवाच्या यात्रेची सांगता

**चाकण (दै. संध्या)**

वाद्यवृंदाच्या गजरात नवसाच्या बगाडाची मिरवणूक, तळी भंडार, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल आदी विविध उपक्रमांनी चाकण लगतच्या मेदनकरवाडी येथील खंडोबा देवाच्या यात्रेची मोठ्या दिमाखात सांगता करण्यात आली. चाकणलगत प्रतिजेजुरी म्हणून मेदनकरवाडी येथे खंडोबाचे देवाचे मंदिर आहे. खंडोबाच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक येथे आले होते.

पहाटे देवाचा अभिषेक, होमहवन, पूजा, आरती महाआरती करण्यात आली. खंडोबा मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष व उपसरपंच ॲड. संकेत मेदनकर, सरपंच अमोल साळवे, यात्रा कमिटीचे अध्यक्ष लक्ष्मण मेदनकर, माजी उपसरपंच महेंद्र मेदनकर, बाळासाहेब मेदनकर, शिवाजी मेदनकर, संजय वाघमारे, संभाजी मेदनकर, डॉ. विजय मेदनकर, हेमंत भुजबळ, अमित बापू मेदनकर, गणेश भुजबळ, राहुल मेदनकर, अरुण तोडकर, हर्षल भुजबळ आदींनी भाविकांचे स्वागत केले. यात्रेमध्ये हौसे, नवसे व गवसे यांनी यात्रेचा मनमुराद आनंद लुटला.

## ज्वारी पिकावर चिकटा, तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव



बदलत्या वातावरणामुळे ज्वारी पिकावर चिकटा तसेच तांबेरा व करपा रोग पडला आहे.यंदा ज्वारी पीक जोमात आले आहे. मात्र, मागील दोन महिन्यांपासून या परिसरात बदलत असणाऱ्या वातावरणामुळे ज्वारी हुरड्यात येऊनही कणसातअद्यापपर्यंत अपेक्षित दाणा भरलेला नाही.त्यामुळे ज्वारीच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे;मात्र,असे असले तरी कडबा चांगल्या प्रकारे निघणार असून कडब्याला चांगल्या प्रकारचा भाव मिळण्याची अपेक्षा आहे.

**- कुशल शेतकरी रामदास मदने**

**वाल्हे (दै. संध्या)**

वाल्हे (ता.पुरंदर) परिसरामध्ये रब्बी हंगामातील ज्वारीचे पीक सततच्या बदलत्या हवामानामुळे धोक्यात आले असून,पिकावर मोठ्या प्रमाणावर चिकटा,तांबेरा तसेच करपा रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे.त्यामुळे यावर्षी ज्वारीच्या उत्पन्नात मोठी घट होणार असल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

पुरंदर तालुक्यात गेल्या काही वर्षांपूर्वी भीषण दुष्काळी परिस्थिती होती. तालुक्याच्या अनेक भागांमध्ये पशुधन जगविण्यासाठी चारा छावण्या उभारल्या होत्या. मात्र यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्याने या परिसरात ज्वारीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेण्यात आले आहे.

मात्र सद्यःस्थितीत बदलत्या हवामानामुळे या पिकावर चिकटा रोगाचा प्रादुर्भाव झाला असून,पिकाची पानगळ तसेच कमी प्रमाणात दाणे भरणे,तर काही ठिकाणी पिकेही लोळू लागली असल्याचे चित्र आहे. त्यातच डोंगर परीसरात दिसणाऱ्या पिकात रानडुकरांचा देखील उपद्रव वाढल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावून जाणार की काय ? या भीतीने शेतकरी पुरता हवालदिल झाला आहे.

## आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक यांना अभिवादन



**जेजुरी (दै. संध्या)**

आद्य क्रांतिवीर उमाजी राजे नाईक युथ फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जेजुरी गडावर उमाजीराजे नाईक यांच्या १९४ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यात आले.

श्री मार्तंड देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे, विश्वस्त पोपट खोमणे,संघटनेचे राज्य अध्यक्ष रवींद्र खोमणे,नगरसेवक रोहित खोमणे,माजी नगरसेवक रमेश बयास व समाज बांधवांच्या वतीने आद्य क्रांतिकारक उमाजी राजे नाईक यांच्या पुतळ्यावर पुष्पवृष्टी करून त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यात आले.

जेजुरी गडाच्या पायरी मार्गावर उमाजी राजे नाईक यांचा पूर्णाकृती पुतळा असून त्यांचे कार्याची माहिती लाखो भाविकांना व्हावी यासाठी जेजुरी देवसंस्थान च्या वतीने म्युरल उभारले जाईल असे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे यांनी सांगितले. जेजुरी नगरपालिकेमध्ये रामोशी समाजाला प्रथमच प्रतिनिधित्व मिळाले. स्वातंत्र्या नंतर पहिल्यांदाच रामोशी समाजाची मान उंचावली आणि इतिहासात नोंद झाली असे रवींद्र खोमणे यांनी सांगितले.

या कार्यक्रमा वेळी नगरसेविका सौ.मंदा बयास विश्व हिंदू परिषदेचे राजाभाऊ चौधरी, कामगार नेते सुरेश उबाळे, किर्लोस्कर कंपनीचे युनियन सेक्रेटरी रोहित घाटे श्री मार्तंड देवसंस्थान व्यवस्थापक आशिष बाठे ,सचिन शिंदे, सागर पाटील युथ फाऊंडेशनचे शिवाजी चव्हाण ,पोपटराव बोडरे ,सोमनाथ मदने, संपदा खोमणे, संगिता बोडरे, अशोक खोमणे, मल्हारी चव्हाण संजिवन बोडरे, आदी यावेळी उपस्थित होते.



## धानोरे ग्रामस्थांकडून अजितदादा पवार यांना श्रद्धांजली

**आळंदी (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या विमान अपघाती निधनाने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. त्यांच्या अचानक जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी असल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांपासून कार्यकर्त्यांपर्यंत व्यक्त होत आहे. त्यांच्या लोकहितकारी कार्याची आठवण म्हणून धोनोरे गावातील ग्रामस्थांच्या वतीने भावपूर्ण शोकसभा आयोजित करण्यात आली. या शोकसभेत प्रा. डॉ.हेमकांत गावडे, आदर्श शिक्षक पांडुरंग गावडे, माजी केंद्रप्रमुख उल्हास रोकडे, ॲड.संदीप मच्छिंद्र गावडे, कामगार नेते धिरज साबळे, भानुदास गावडे, युवासेना उपजिल्हा प्रमुख सचिन गावडे, रोहिदास गावडे आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ॲड.संदीप गावडे यांनी स्व. अजितदादा हे सर्वसामान्यांचा नेता असून गोरगरिबांच्या प्रश्नांसाठी ते सदैव झटत राहिले. कठोर निर्णय घेण्याची क्षमता आणि प्रशासकीय कौशल्यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या विकासात मोलाचे योगदान दिले, अशा शब्दांत त्यांनी आदरांजली वाहिली.

# निवडणूक काळात धारदार हत्यारांसह तरुण जेरबंद

## बारामती तालुका पोलिसांची धडक कारवाई; दुचाकी, दोन तलवारी व कोयता जप्त

**बारामती (दै. संध्या)**



कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचा कुणीही प्रयत्न करू नये. बेकायदेशीर हत्यारे बाळगणे,दहशत निर्माण करणे,धमकावणे किंवा संशयास्पद हालचाली करताना कोणीही आढळून आल्यास संबंधित व्यक्तीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. **- सुदर्शन राठोड, उपविभागीय पोलीस अधिकारी**

कोणताही अनुचित प्रकार आढळून आल्यास किंवा अशा प्रकारांची माहिती मिळताच नागरिकांनी तात्काळ बारामती तालुका पोलिसांशी संपर्क साधावा, कायदा हातात घेणाऱ्यांवर कारवाई होणारच.

**-चंद्रशेखर यादव, पोलीस निरीक्षक**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कुणीही कायदा हातात घेऊ नये, गुन्हेगारांच्या प्रत्येक हालचालीवर बारामती पोलिसांचे लक्ष आहे.असे काही अनुचित प्रकार करण्याचा कुणी प्रयत्न केला तर अशांवर कठोर कारवाई केली जाईल, कुणाचीही गय केली जाणार नाही.

**- गणेश बिरादार, अपर पोलीस अधीक्षक बारामती विभाग**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या कडेकोट पोलिस बंदोबस्तात बारामती तालुका पोलिसांनी कारवाई करत एका तरुणाला तलवार व कोयत्यासारखी धारदार हत्यारे बाळगताना रंगेहाथ पकडले आहे. ही कारवाई संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावर रूई ब्रिज परिसरात करण्यात आली.

दि.२ फेब्रुवारी रोजी बारामती तालुका पोलीस निवडणुकीच्या अनुषंगाने पेट्रोलिंग सुरू असताना एका बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली. एका होंडा युनिकॉर्न दुचाकीवरून एक इसम तलवार व कोयता बाळगून एमआयडीसीकडून भवानी नगरच्या दिशेने जात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने सापळा रचला. रूई ब्रिजखाली संशयित दुचाकी अडवून तपास केला असता ओंकार रामचंद्र काळे (वय १९ रा. सणसर ता. इंदापूर जि.पुणे) असे आरोपीचे नाव निष्पन्न झाले. त्याच्या दुचाकीच्या डाव्या बाजूला असलेल्या पांढऱ्या रंगाच्या पिशवीतून दोन लोखंडी तलवारी व एक धारदार कोयता मिळून आला. पंचांच्या उपस्थितीत पोलिसांनी झडती घेऊन ही सर्व हत्यारे तसेच दुचाकी जप्त केली. यात

होंडा युनिकॉर्न दुचाकी (एम. एच. ४२ बी.जी ७३७७) अंदाजे किंमत ३०,००० रु.,पितळी मुठ असलेली तलवार (६७ सेमी) अंदाजे किंमत १,५०० रु, लोखंडी तलवार (४५ सेमी) अंदाजे किंमत ५०० रु, लोखंडी धारदार कोयता अंदाजे किंमत ३०० रु. एकूण जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे ३२,३०० रु इतकी आहे.

बेकायदेशीररीत्या हत्यारे बाळगल्याप्रकरणी आरोपी ओंकार काळे याच्याविरोधात भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती तालुका पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव तसेच अमोल कदम पोलीस उपनिरीक्षक बारामती तालुका आणि पोलीस अंमलदार सुरेंद्र वाघ,मनोज पवार,अवधूत शिंदे,भारत खारतोडे,दादा दराडे यांनी केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जनगणना 2027 करिता महानगरपालिका तयार; पूर्णतः डिजिटल स्वरुपात होणार

भिवंडी (दैनिक संध्या) : स्वातंत्र्यानंतरच्या 8 व्या जनगणनेकरिता भिवंडी महानगरपालिका मुख्यालयामध्ये प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. याकरिता जनगणना संचालनालयाकडून प्रविण भगत, सहायक संचालक व अरुण साळगावंकर, वरिष्ठ निरीक्षक, ग्रेड-1 यांची नियुक्ती करण्यात आली. आज महानगरपालिकेचे प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त, शहर जनगणना अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन), प्रभाग अधिकारी तथा चार्ज अधिकारी यांना घर यादी गट तयार करणे बाबतचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळेच्या जनगणनेचे वैशिष्ट्य म्हणजे ही जनगणना ही पुर्णत: डिजीटल स्वरुपात होणार आहे. याकरिता जनणना संचालनायाने स्वतंत्र CMS (Census Management System) पोर्टल तयार केले आहे. या प्रशिक्षणसाठी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे अतिरीक्त आयुक्त, विठ्ठल डाके, उपायुक्त (प्रशासन) विक्रम दराडे, सहायक आयुक्त जनगणना नितीन पाटील, विभाग प्रमुख जनगणना अजीत महाडिक, महानगरपालिकेतील बांधकाम व नगररचना विभागाचे अभियंते, प्रभाग अधिकारी, कर निरीक्षक हे उपस्थित होते.



### वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महापौरपदी अजीव यशवंत पाटील

■ उप-महापौर पदी मार्शल डॉमनिक लोपीस यांची निवड

विरार (दैनिक संध्या) : वसई विरार शहर महानगरपालिका महापौर आणि उपमहापौर पदाची निवड करण्यासाठी वसई- शहर महानगरपालिकेची मा. विशेष बैठक मंगळवार दि.०३/०२/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, सर्वसाधारण सभागृह, ४ था मजला, यशवंत नगर, विरार (प.) येथे मा.पीठासीन अधिकारी मा. डॉ. इंदुराणी जाखड (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी पालघर यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी झालेल्या मा. महापौर आणि मा. उपमहापौर पदाच्या निवडणूकीत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महापौर पदी अजीव पाटील तसेच उप-महापौर पदी मार्शल डॉमनिक लोपीस यांची निवड झाली. सदर निवड प्रक्रियेच्या बैठकीच्या सुरुवातीस महापौर व उपमहापौर पदासाठी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली. छाननी अंती सादर करण्यात आलेले सर्व नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात आले व वैध नामनिर्देशित उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. यानंतर वैध नामनिर्देशित उमेदवारांना अनुक्रमे महापौर व उपमहापौर पदासाठी सादर केलेले नामनिर्देशन पत्र मागे घेणेबाबत विहित वेळ देण्यात आला. यावेळेत महापौर पदासाठी सादर केलेल्या वैध नामनिर्देशित उमेदवारांपैकी प्रफुल्ल जगन्नाथ साने व निशाद अरुणा अरुण चोरघे यांनी आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतले व यानंतर महापौर पदासाठी अजीव यशवंत पाटील व अॅड.दर्शना त्रिपाठी-कोटक यांची नावे अंतीम उमेदवार म्हणून जाहीर करण्यात येऊन उपस्थित ११५ सदस्यांनी हात वर करून त्यांना मतदान केले. या मतदान प्रक्रियेत एकूण ११५ मतांपैकी अजीव पाटील यांना ७१, तर अॅड. दर्शना त्रिपाठी-कोटक यांना ४४ मते मिळाली. मतदानाअंती महापौर पदासाठी सर्वाधिक मते मिळालेले उमेदवार अजीव यशवंत पाटील यांची महापौर पदी निवड झाल्याचे मा. पीठासीन अधिकारी यांचे मार्फत जाहीर करण्यात आले. तसेच उपमहापौर पदासाठी सादर केलेल्या वैध नामनिर्देशित उमेदवारांपैकी कन्हैया (बेटा) मनोहर भोईर यांनी आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतल्याने उपमहापौर पदासाठी मार्शल डॉमनिक लोपीस व नारायण मांजरेकर यांची नावे अंतिम उमेदवार म्हणून जाहीर करण्यात येऊन उपस्थित ११५ सदस्यांनी हात वर करून त्यांना मतदान केले. या मतदान प्रक्रियेत एकूण ११५ मतांपैकी श्री.मार्शल डॉमनिक लोपीस यांना ७१, तर नारायण मांजरेकर यांना ४४ मते मिळाली. मतदाना अंती उप-महापौर पदासाठी सर्वाधिक मते मिळालेले उमेदवार मार्शल डॉमनिक लोपीस यांची मा.उप-महापौर पदी निवड झाल्याचे मा.पीठासीन अधिकारी यांचे मार्फत जाहीर करण्यात आले.

# भारतात हायरिंग प्रक्रिया अधिक आव्हानात्मक

## ७१% रिक्रूटर्स 'छुप्या टॅलेंट'चा शोध घेण्यासाठी एआयचा वापर करत असल्याचे LinkedInचे संशोधन

मुंबई (दै. संध्या)

भारतातील हायरिंग बाजार वेगाने विस्तारत असला, तरी योग्य टॅलेंट शोधणे रिक्रूटर्ससाठी अधिकच कठीण होत असल्याचे चित्र समोर आले आहे. LinkedInच्या नव्या संशोधनानुसार, ७४ टक्के रिक्रूटर्सना पात्र उमेदवार शोधण्यासाठी पूर्वीपेक्षा अधिक वेळ आणि प्रयत्न करावे लागत आहेत. याच कालावधीत, हायरिंगचे प्रमाण महामारीपूर्वीच्या तुलनेत तब्बल ४० टक्क्यांनी वाढले आहे.

या आव्हानामागील प्रमुख कारण म्हणजे अर्जांची संख्या आणि उमेदवारांच्या गुणवत्तेमधील वाढती तफावत. अर्ध्याहून अधिक रिक्रूटर्स (५३%) एआय-निर्मित अर्जांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे सांगतात, तर ४७ टक्के रिक्रूटर्स मागणीतील कौशल्यांची सातत्याने कमतरता असल्याचे नमूद करतात. जवळपास ४८ टक्के रिक्रूटर्ससाठी कमी दर्जाचे किंवा दिशाभूल करणारे अर्ज वेगळे करणे ही मोठी डोकेदुखी ठरत असून, त्यामुळे संपूर्ण हायरिंग प्रक्रिया संथ होत आहे.

याचा थेट परिणाम म्हणजे कामगार बाजारपेठेत प्रचंड स्पर्धा वाढली आहे. लिंक्डइन प्लॅटफॉर्मवरील डेटानुसार, भारतात प्रत्येक रिक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची संख्या २०२२ पासून दुपटीहून अधिक झाली आहे. तसेच, ७२ टक्के प्रोफेशनल्स सांगतात की ते २०२६ मध्ये सक्रियपणे नोकरी शोधत आहेत, मात्र ८५ टक्क्यांना या प्रक्रियेसाठी आपण पुरेसे सज्ज नसल्याची भावना आहे.

या वाढत्या दबावाच्या पार्श्वभूमीवर, रिक्रूटर्स एआयला प्रभावी उपाय म्हणून स्वीकारत आहेत. भारतातील एआयचा वापर करणाऱ्या ७१ टक्के रिक्रूटर्सचे म्हणणे आहे की, एआयमुळे त्यांना अशा उमेदवारांचा शोध घेता आला, ज्यांच्याकडे योग्य कौशल्ये असूनही ते यापूर्वी त्यांच्या नजरेत आले नव्हते.

८० टक्के रिक्रूटर्स सांगतात की एआयमुळे उमेदवारांच्या कौशल्यांचे मूल्यांकन अधिक सोपे झाले आहे, तर ७६ टक्क्यांच्या मते एआयमुळे हायरिंग प्रक्रिया लक्षणीयरीत्या जलद होत आहे.

भविष्यात एआयचा वापर आणखी वाढण्याची शक्यता आहे. भारतातील दहा पैकी आठ रिक्रूटर्स २०२६ मध्ये हायरिंग उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, अर्जांचे मूल्यांकन करण्यासाठी आणि सर्वोत्तम टॅलेंटची निवड करण्यासाठी एआयचा वापर वाढवण्याचे नियोजन करत आहेत. तसेच, प्राथमिक मुलाखतींसाठी एआयचा अधिक वापर केल्यास रिक्रूटर-उमेदवार संवाद सुधारेल (८३%), प्रक्रिया जलद होईल (८३%) आणि कौशल्यांविषयी अधिक सखोल माहिती मिळेल (८२%), असा त्यांचा विश्वास आहे.

Ruchi Anand, व्हीपी – एपीएसी, लिंक्डइन टॅलेंट सोल्यूशन्स, म्हणाल्या, "हायरिंग प्रक्रियेत एक मोठा रचनात्मक बदल होत आहे. आता केवळ पदव्या किंवा पूर्वीच्या पदांवर नव्हे, तर उमेदवाराच्या प्रत्यक्ष कौशल्ये आणि क्षमतेवर भर दिला जात आहे. एआयशिवाय हा बदल घडवून आणणे कठीण आहे. जबाबदारीने वापरल्यास एआय योग्य कौशल्ये वेगाने ओळखण्यास, निवडीतील अडथळे कमी करण्यास आणि अधिक निष्पक्ष व सातत्यपूर्ण मूल्यांकन प्रक्रिया निर्माण करण्यास मदत करते. लिंक्डइनमध्ये आम्ही 'हायरिंग असिस्टंट'सारखी एआय टूल्स विकसित करत आहोत, ज्यामुळे रिक्रूटर्सना उमेदवाराच्या अनुभवाशी तडजोड न करता अधिक आत्मविश्वासाने आणि जलद निर्णय घेता येतात."

पारदर्शकतेची वाढती मागणी

हायरिंगमध्ये एआयचा वापर वाढत असताना, उमेदवारांकडून पारदर्शकतेची अपेक्षाही वाढत आहे. भारतातील ५० टक्के रिक्रूटर्स सांगतात की, उमेदवारांचे स्क्रिनिंग व शॉर्टलिस्टिंग करताना एआयचा कसा वापर केला जातो, याबाबत स्पष्ट माहिती देण्याचा त्यांच्यावर दबाव आहे. यावरून रिक्रूटर आणि नोकरीसाधक यांच्यात विश्वास निर्माण करण्यासाठी पारदर्शकतेचे महत्त्व अधोरेखित होते.

भारतातील रिक्रूटर्सना वेग आणि गुणवत्ता या दोन्ही आव्हानांवर मात करता यावी यासाठी लिंक्डइन एआय-समर्थित हायरिंग टूल्समध्ये सातत्याने गुंतवणूक करत आहे:

सॅलरी व नोटीस पीरियड फिल्टर्स: उमेदवारांना अपेक्षित वेतन व नोटीस कालावधी शेअर करण्याची सुविधा, जी फक्त रिक्रूटर्सना दिसते, त्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यातील वेळखाऊ चर्चा टळतात.

हायरिंग असिस्टंट: एएमडी, ऑरेकॉन, चीवी, एक्स्पेडिया ग्रुप, फॅबलेटिक्स, जेकब्स, सिमेन्स आणि विप्रोसारख्या कंपन्यांना पात्र टॅलेंट जलद शोधण्यात मदत. या टूलमुळे प्रोफाइल तपासणीमध्ये ६२% घट, प्रत्येक पदासाठी चार तासांपेक्षा जास्त वेळेची बचत आणि इनमेल स्वीकारण्याच्या दरात ६९% वाढ झाली आहे.

लिंक्डइन हायरिंग प्रो: लघु व्यवसायांसाठी विकसित केलेले एआय टूल, जे उमेदवार शोध, शॉर्टलिस्टिंग आणि संपर्क प्रक्रिया वेगवान करते. सुरुवातीच्या वापरातून ६०% नियोक्त्यांनी पहिल्याच आठवड्यात मुलाखतीसाठी उमेदवार शोधल्याचे निदर्शनास आले असून, आठवड्याला सरासरी सहा तासांहून अधिक वेळेची बचत होत आहे.

यामध्ये एआय-पॉवर्ड प्राथमिक मुलाखती, अधिक संवादात्मक इंटरफेस आणि पात्र उमेदवारांशी थेट संपर्क साधण्यासाठी एआय-असिस्टेड वैयक्तिकृत इनमेल्स यांचा समावेश आहे.

## जागतिक कर्करोग दिवस : मधुमेह व लठ्ठपणामुळे कर्करोगाचा धोका वाढला

पुणे (दै. संध्या)



भारतात विशेष करून तरूण वयात मधुमेह आणि लठ्ठपणाचे वाढते प्रमाण हे चिंताजनक असून यामुळे कर्करोगाची जोखीम देखील वाढत आहे. त्यामुळे मधुमेह व लठ्ठपणाकडे फक्त जीवनशैलीशी निगडीत समस्या म्हणून न बघता गांभीर्याने बघण्याची गरज आहे,असे मत विविध तज्ज्ञांनी व्यक्त केले. 4 फेब्रुवारीला जागतिक कर्करोग दिनानिमित्त लवकर निदान व उपचाराचे महत्त्व याबाबत जागरूकता निर्माण केली जाते.

नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटर येथील ऑॅंकोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ.मिनिष जैन म्हणाले की,चयापचयमधील असंतुलन आणि दीर्घकालीन दाहक स्थिती कर्करोगाच्या पेशींसाठी अनुकूल वातावरण निर्माण करतात. लठ्ठपणा हा एक प्रमुख जोखीम कारक घटक असून सध्या किमान 13 प्रकारच्या कर्करोगांशी असलेल्या जोखमीशी संबंधित आहे. इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता सततच्या दाहक स्थितीला आणखी हातभार लावते आणि कर्करोगाची जोखीम आणखी वाढू शकते.

ते पुढे म्हणाले की,लठ्ठ व सहव्याधी असलेल्या व्यक्तींमध्ये ट्युमर हे जास्त आक्रमक दिसून येतात आणि यामुळे कर्करोगाचे उपचार अधिक गुंतागुंतीचे होतात. उदाहरण द्यायचे झाले तर लठ्ठ व्यक्तींमध्ये केमोथेरपीवाटे दिलेली औषधे चरबी मध्ये साठवून कालांतराने हळूहळू बाहेर येतात.ज्यामुळे हानीकारकता वाढून त्याची परिणामकारकता कमी होऊ शकते. त्याचबरोबर योग्य औषधांचे प्रमाण निश्चित करणे देखील अशा परिस्थितीत आव्हानात्मक होते आणि उपचारांना कमी प्रतिसाद मिळाल्यास परिणामांवर प्रभाव पडू शकतो. डॉ.जैन पुढे म्हणाले की,लठ्ठपणा आणि मधुमेह या आजारांकडे जीवनशैलीशी निगडीत समस्यांपलीकडे पाहणे गरजेचे आहे.योग्य आहार,व्यायाम आणि वजनावर नियंत्रण ठेवल्यास भविष्यातील संभाव्य अनेक आजारांची जोखीम आपण कमी करू शकतो.

निदान प्रक्रियेतील सुधारणा,कर्करोग या आजाराबाबत एकंदर अधिक प्राप्त झालेले ज्ञान आणि आधुनिक उपचार पर्याय यामुळे परिणामांमध्ये आमुलाग्र सुधारणा होत आहेत.मात्र मनाचा कणखरपणा हा दीर्घकालीन चालणाऱ्या कर्करोग उपचारांदरम्यान अतिशय महत्त्वाचा ठरतो.कर्करोग आणि त्याच्याशी निगडीत शस्त्रक्रियेसह उपचार पर्यायांची साहजिकच रूग्णांमध्ये भीती असते.मात्र योग्य मार्गदर्शन आणि पाठबळ दिल्यास या आव्हानांवर मात केली जाऊ शकते.


## दोन्ही राष्ट्रवादी कॉँग्रेस विलीनीकरणास भाजपचा विरोध

मुंबई (दै. संध्या)

अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यात सध्या दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाची चर्चा सुरू आहे. यावर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी दिल्लीत पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. यांच्यात एकत्रिकरण यावर चर्चा झाल्याची माहिती आहे. यावेळी अमित शहा यांनी या लोकांना यात राजकारण दिसत आहे असं विधान प्रफुल्ल पटेल यांच्या समोर केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे अमित शहा आणि भाजप यांचा दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाला विरोध तर नाही ना? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच अजित पवार यांचे विधी पार पडल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी दिल्लीला घेऊन या असे निमंत्रण पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी पटेल यांना दिल्याची माहिती सुत्रांनी दिली. राष्ट्रवादी कॉँग्रेसचे कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल यांनी आज दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली आहे. या भेटीत पटेल यांनी राज्यातील राजकीय परिस्थितीची माहिती त्यांना दिली आहे. यावेळी मोदी आणि शहा यांनी सुनेत्रा पवार यांना दिल्लीला बोलावले असल्याची माहिती आहे. आज एनडीए संसदीय दलाच्या बैठकीनंतर या तिन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे आता दिल्लीतील घडामोडींना वेग आला आहे.अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे.

## किर्लोस्कर ब्रदर्सच्या तामिळनाडूतील कनियूर उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन

पुणे (दै. संध्या)



किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड (केबीएल), अग्रणी भारतीय बहुराष्ट्रीय अभियांत्रिकी कंपनी आणि द्रव व्यवस्थापन उपाययोजनांत पथदर्शक असलेल्या या कंपनीने, तामिळनाडूतील कनियूर उत्पादन प्रकल्पात नवीन फॅक्टरी इमारतीचे उद्घाटन या आठवड्यात केले. हे उद्घाटन जानेवारी १९२६ मध्ये भारतातील पहिला सेंट्रीफ्यूगल पंप उत्पादन व स्थापनेच्या १०० वर्षांच्या स्मरणपूर्तीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आले.

नवीन फॅक्टरीचे डिझाईन उत्पादकता वाढवणे, कार्यक्षमता सुधारणे आणि प्रगत उत्पादन प्रक्रियांना सक्षम करणे यासाठी तयार करण्यात आले आहे. यामुळे केबीएल देशांतर्गत तसेच जागतिक वाढत्या मागणीची पूर्तता करताना गुणवत्ता मानकांमध्ये कोणतीही तडजोड होऊ देणार नाही.

उद्घाटनाबद्दल प्रतिक्रिया देताना किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेडच्या संयुक्त व्यवस्थापकीय संचालक सुश्री रमा किर्लोस्कर म्हणाल्या, "कनियूरमधील ही नवीन फॅक्टरी भारताच्या मॅन्युफॅक्चरिंग स्ट्रेंथवरील आमच्या विश्वासाचा आणि भविष्याच्या तयारीचा पुरावा आहे. भारतातील पहिल्या सेंट्रीफ्यूगल पंप स्थापनेच्या १०० वर्षांचा टप्पा साजरा करताना, ही सुविधा नाविन्यपूर्ण आणि उच्च-गुणवत्तेच्या उपाययोजना पुरवण्याची आमची क्षमता अधिक बळकट करते तसेच ग्राहक मूल्य, मानव संसाधन सक्षमीकरण व राष्ट्रनिर्मितीशी असलेली आमची बांधिलकीही अधोरेखित करते." या सुविधेवरील सौर ऊर्जा प्रकल्प केबीएलच्या शाश्वततेच्या प्रयत्नांमधील महत्त्वाचा टप्पा आहे. यामुळे १२२.५ $tCO_2e$ इतका कार्बन उत्सर्जनात घट होणार असून स्कोप १ आणि २ उत्सर्जनामध्ये ८९% घट अपेक्षित आहे. नवीकरणीय स्रोतांमधून आता या सुविधेतील जवळपास ८०% विद्युत मागणीची पूर्तता होत असून, ऊर्जा कार्यक्षमता, दीर्घकालीन खर्च स्थैर्य आणि जबाबदार वाढ यांना चालना मिळत आहे. या उपक्रमामुळे वार्षिक सुमारे ₹२१.६४ लाखांची बचतही होणार आहे.

कनियूरमधील ही नवीन फॅक्टरी भारता च्या मॅन्युफॅक्चरिंग स्ट्रेंथवरील आमच्या विश्वासाचा आणि भविष्याच्या तयारीचा पुरावा आहे.

भारतातील पहिल्या सेंट्रीफ्यूगल पंप स्थापनेच्या १०० वर्षांचा टप्पा साजरा करताना, ही सुविधा नाविन्यपूर्ण आणि उच्च-गुणवत्तेच्या उपाययोजना पुरवण्याची आमची क्षमता अधिक बळकट करते तसेच ग्राहक मूल्य, मानव संसाधन सक्षमीकरण व राष्ट्रनिर्मितीशी असलेली आमची बांधिलकीही अधोरेखित करते."

# झायडस पिंकॅथॉनचे सात वर्षांनंतर पुण्यात शानदार पुनरागमन

## शहरातील महिलांच्या धावण्याच्या चळवळीला पुन्हा नवी ऊर्जा




पुणे (दै. संध्या)

सात वर्षांच्या खंडानंतर, झायडस पिंकॅथॉन पुण्यात परत येत आहे, जे भारतातील महिलांच्या सर्वात मोठ्या धावण्याच्या मंचांपैकी एक असलेल्या या स्पर्धेसाठी एक महत्त्वपूर्ण पुनरागमन आहे. शहरात शेवटची स्पर्धा २०१९ मध्ये आयोजित करण्यात आली होती. पुणे पर्वाचे अधिकृत अनावरण मंगळवारी हयात रीजन्सी पुणे अँड रेसिडेन्सेस येथे आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आले. या परिषदेला पिंकॅथॉनचे संस्थापक, अभिनेते आणि एंड्युरन्स आयकॉन मिलिंद सोमण, इन्व्हिन्सिबल वुमनच्या संस्थापिका अंकिता कोनवर आणि झायडस लाइफसायन्सेसचे अग्रगण्य कर्करोगतज्ञ डॉ. तुषार पाटील उपस्थित होते. या घोषणेने महिलांची फिटनेस, प्रतिबंधात्मक आरोग्य आणि सहभागावर आधारित धावण्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या झायडस पिंकॅथॉनच्या २०२५-२६ च्या देशव्यापी हंगामाची सुरुवात झाली आहे. पुणे येथील ही शर्यत ५ एप्रिल, २०२६ रोजी एएफएमसी ग्राउंड येथे होणार आहे.

या हंगामातील मुंबई आणि बंगळूरु येथील यशस्वी आवृत्त्यांनंतर हयात रीजन्सी पुणे अँड रेसिडेन्सेस येथे ही घोषणा करण्यात आली. मुंबई व बंगळुरू आवृत्त्याना मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळाला आणि ज्यामुळे प्रमुख शहरांमध्ये झायडस पिंकॅथॉनचा वाढता प्रभाव अधोरेखित झाला. पुण्यात, हा प्लॅटफॉर्म समुदाय आणि सहनशक्तीच्या वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपांसह परत येत आहे, तसेच महिलांच्या आरोग्यावर प्रकाश टाकत आहे, ज्यामध्ये लवकर निदान आणि नियमित स्व-स्तन तपासणीबद्दलच्या जागृतीचा समावेश आहे. पुणे आवृत्तीमध्ये झायडस पिंकॅथॉन चळवळीची विविधता आणि उद्देश दर्शवणाऱ्या मॅस्कॉट्सची एक दमदार फळी असेल. मृणाल इनामदार पारंपरिक नऊवारी साडी नेसून सुपर ७५ किमी गटाचे प्रतिनिधित्व करतील, तर दृष्टीहीन धावपटू ललिता पवार फॅब्युलस ५० किमी गटाचे नेतृत्व करतील. १०० किमी गटासाठी ६१ वर्षीय ईएनटी सर्जन डॉ. नीलम वैद्य मॅस्कॉट असतील, ज्या लवचिकता आणि आजीवन तंदुरुस्तीचे प्रतीक आहेत. १० किमी धावण्याचे प्रतिनिधित्व कर्करोगावर मात केलेल्या डॉ. मिताली उपाध्याय करतील, लाइफलाँग ५ किमी गटाचे प्रतिनिधित्व पिंकॅथॉनचे संस्थापक मिलिंद सोमन यांच्या ८७ वर्षीय आई उषा सोमन करतील आणि ३ किमी गटाचे प्रतिनिधित्व आपल्या बाळाला सोबत घेऊन धावणारी आई मयुरी दास करेल, जी सर्वसमावेशक सहभागावर प्रकाश टाकते.

या अनावरणप्रसंगी बोलताना, पिंकॅथॉनचे संस्थापक मिलिंद सोमण म्हणाले, "पुण्यात नेहमीच धावण्याची एक मजबूत संस्कृती राहिली आहे, आणि सात वर्षांनंतर येथे परत येणे विशेषतः अर्थपूर्ण वाटते. या हंगामात हा मंच संपूर्ण भारतात आपला प्रवास सुरू ठेवत असताना, पुणे हे एक महत्त्वाचे थांबे बनले आहे, जे सामुदायिक सहभाग, स्पर्धात्मक धावणे आणि आरोग्य जागरूकता यांना एकाच छत्राखाली आणते. येथील पुनरागमनामुळे भारतात महिलांच्या धावण्याच्या क्षेत्रात किती वाढ झाली आहे आणि योग्य संधी मिळाल्यास महिला किती सातत्याने पुढे येतात, हे दिसून येते."

पुणे आवृत्तीमध्येही झायडस पिंकॅथॉनचा आरोग्यविषयक संवादांशी असलेला संबंध कायम ठेवण्यात आला आहे, ज्यामध्ये प्रतिबंधात्मक पद्धती आणि स्तनाच्या कर्करोगाविषयीच्या जागृतीवर नव्याने लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यामुळे फिटनेस कार्यक्रम केवळ शर्यतीपुरते मर्यादित न राहता, दीर्घकालीन आरोग्य संवादासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करू शकतात, ही कल्पना अधिक दृढ होते.

इन्व्हिन्सिबल वुमनच्या संस्थापिका अंकिता कोनवर म्हणाल्या, "महिला फिटनेसकडे एखाद्या विशिष्ट कार्यक्रमाशी संबंधित गोष्ट म्हणून न पाहता, ती आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग म्हणून स्वीकारत आहेत, हे पाहून मला खूप आनंद होतो. पुणेसारख्या शहरांमध्ये, नियमितपणे उपस्थित राहणे, स्वतःच्या मर्यादा ओलांडणे आणि सातत्य राखणे याबद्दल एक शांत पण दृढ वचनबद्धता दिसून येते. पिंकॅथॉन एक अशी रचना तयार करते, जिथे ही मानसिकता विविध अंतर, वय आणि जीवनाच्या विविध टप्प्यांवरील महिलांमध्ये वाढू शकते." यामध्ये भर घालत, झायडसचे अग्रगण्य कर्करोगतज्ञ डॉ. तुषार पाटील म्हणाले, "झायडस पिंकॅथॉनमध्ये महिला फिटनेस आणि जागरूकता या दोन्हीसाठी एकत्र येत आहेत, हे पाहणे प्रेरणादायी आहे. सक्रिय राहिल्याने शरीर मजबूत होते, तर लवकर तपासणी हे स्तनाच्या कर्करोगाविरुद्ध आपले सर्वात मोठे संरक्षण आहे. दर महिन्याला स्वतःची साधी तपासणी, फक्त दोन हात आणि तीन मिनिटे, धोक्याची चिन्हे लवकर ओळखण्यास मदत करू शकते. पुणेसारख्या शहरांमध्ये, अशा लहान, सातत्यपूर्ण कृती खरोखरच जीव वाचवू शकतात आणि झायडस पिंकॅथॉनसारखे उपक्रम या महत्त्वाच्या संवादांना समाजात पोहोचवण्यास मदत करतात."

या प्रसंगी बोलताना, झायडस लाइफसायन्सेसचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शर्विल पटेल म्हणाले, "'इझिएस्ट एक्झाम' या मोहिमेद्वारे, आम्ही महिलांना हे ज्ञान देऊन सक्षम करू इच्छितो की दर महिन्याला केलेली एक साधी ३-मिनिटांची स्व-तपासणी जीव वाचवणारा बदल घडवू शकते. पिंकॅथॉनशी हातमिळवणी करून, आम्ही अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचण्याचे, जागरूकता वाढवण्याचे आणि स्तनाच्या कर्करोगाविरुद्धच्या लढ्यात सामूहिक कृतीसाठी प्रेरणा देण्याचे ध्येय ठेवले आहे. आमचा विश्वास आहे की महिलांच्या आरोग्याविषयी आणि स्तनाच्या कर्करोगाविषयी जागरूकता वाढवणे तितकेच महत्त्वाचे आहे, कारण लवकर निदान झाल्यास असंख्य जीव वाचवण्याची शक्ती त्यात आहे."

## थोडक्यात पण महत्वाचे...



### राष्ट्रीय रोजगार मेळाव्यात सुशिक्षित बेरोजगारीवर मंथन

चाकण (दैनिक संध्या) : सातपुडा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय रोजगार मेळाव्यात देशभरातील सुशिक्षित युवकांसाठी बेरोजगारीवर मंथन करण्यात आले. युवकांना यावेळी रोजगार व करिअर मार्गदर्शनाचे प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. या मेळाव्यात सुमारे पंचवीस हजारांहून अधिक युवकांनी सहभाग नोंदवला होता. त्यामुळे हा मेळावा भारतातील मोठ्या व महत्त्वपूर्ण रोजगार मेळाव्यांपैकी एक वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. या राष्ट्रीय रोजगार मेळाव्याच्या अंतर्गत "भारतामधील सुशिक्षित बेरोजगारी आणि रोजगाराच्या उपलब्ध संधी" या विषयावर विशेष पॅनल चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चेत टॅलेंटकॉर्प सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मेहबूब सैय्यद यांनी उद्योगतज्ज्ञ म्हणून भाग घेतला होता. त्यांनी उद्योग क्षेत्रातील सध्याची वास्तव परिस्थिती स्पष्ट करत युवकांना आवश्यक कौशल्ये, अपेक्षा व संधी याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. सैय्यद यांनी सांगितले की,"आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक पदवी पुरेशी नसून, व्यावहारिक ज्ञान, कामाची शिस्त, संवाद कौशल्ये आणि सातत्याने नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची गरज आहे. शिक्षण संस्था व उद्योग यांच्यात योग्य समन्वय साधल्यास युवकांना रोजगारासाठी अधिक सक्षम करता येईल." उद्योजक संजीव मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली हा राष्ट्रीय रोजगार मेळावा उत्साहात संपन्न झाला. कौशल्य विकास, व्यावसायिक प्रशिक्षण आणि प्रभावी करिअर मार्गदर्शन हे शिक्षण व्यवस्थेचा अविभाज्य भाग असणे आवश्यक असल्याचे मिश्रा यांनी सांगितले. रोजगार मेळावा हा युवकांसाठी केवळ रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा नसून, त्यांना योग्य दिशा, आत्मविश्वास आणि उद्योग जगतात प्रवेशासाठी आवश्यक मार्गदर्शन करणारा आहे. अशा प्रकारचे उपक्रम देशातील सुशिक्षित बेरोजगारीची समस्या कमी करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असा विश्वास मिश्रा यांनी यावेळी व्यक्त केला.

### वाहन मालकांना अटकावून ठेवलेली वाहने 5 फेब्रुवारीपर्यंत सोडवून घेण्याचे आवाहन

बारामती (दैनिक संध्या) : बारामती उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत दंड तसेच कर भरल्यामुळे अटकावून ठेवलेली १३ वाहने ५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सोडवून घ्यावीत. या वाहनांची यादी कार्यालयाच्या सूचना फलकांवर तसेच परिवहन विभागाच्या www.transport.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. विहीत मुदतीत वाहनांचा ताबा न घेतल्यास या वाहनांच्या जाहीर लिलाव धातू भंगार व व्यापार महामंडळमार्फत www.mstcecommerce.com या संकेतस्थळावर ६ फेब्रुवारी रोजी करण्यात येईल. अधिक माहितीकरिता कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही उप प्रादेशिक अधिकारी सुरेंद्र निकम यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

### माध्यम समन्वयकांनी चोखपणे जबाबदारी पार पाडावी : युवराज पाटील

पुणे(दैनिक संध्या) : जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकाच्या दरम्यान मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेत 'माध्यम समन्वयकाची भूमिका' या विषयावर जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती सदस्य युवराज पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिनस्त नियुक्त माध्यम समन्वयकांसोबत दूरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधला. जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ प्रक्रिया शांततेत, निर्भय आणि न्याय वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने माध्यम समन्वयकाची भुमिका महत्वपूर्ण; त्यामुळे माध्यम समन्वयकांना देण्यात आलेल्या जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडाव्यात, अशी सूचना श्री. पाटील यांनी केली. यावेळी श्री. पाटील यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकाच्या दरम्यान प्रसारमाध्यमांसाठी असलेल्या सुविधा, माध्यम कक्षाचे कामकाज, प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान व मतमोजणीच्या दिवशी देण्यात येणारी प्रवेशिका, प्रसार माध्यमांना वेळोवळी निवडणुकीच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देणे, मतदान व मत मोजणी केंद्रावरील घ्यावयाची दक्षता, उमेदवारांच्या जाहिरातीचे प्रमाणीकरण व संनियंत्रण, पेडन्यूज आदी विषयांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित माध्यम समन्वयकांच्या वतीने उपस्थित करण्यात आलेल्या शंकाचे निरसन करण्यात आले.



### नृत्यकला मंदिराच्या त्रीदशकपूर्ती निमित्त दमदार सादरीकरण

पुणे (दैनिक संध्या) : नृत्यकला मंदिर आयोजित नृत्यंजली हा नृत्य रुपीपुष्पे हा 70 विद्यार्थ्यांचा भरतनाट्यम नृत्यावर आधारित कार्यक्रम मनोहर वाढोकर सभागृह निगडी येथे मोठ्या उत्साहात सादर झाला. भरतनाट्यमच्या सुप्रसिद्ध गुरु तेजश्री अडिगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा त्रिदशकपूर्ती सोहळा संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मॉरिशस महाराष्ट्र मंडळ फेडरेशनचे अध्यक्ष बलराज नारू, सदस्य रवीन राव आणि मॉरिशस-भारत कल्चरलचे रिलेशन कमिशनर संदिप जोशी ,सुप्रसिद्ध अभिनेत्री अश्विनी मुकादम, नवनिर्वाचित नगरसेविका शैलजा मोरे,संस्थेचे विश्वस्त अविनाश अडिगे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात वयोगट 7 ते 22 वर्षाच्या 70 विद्यार्थिनींनी विविध नृत्य प्रकार सादर केले. श्लोकमनी सुरुवात झाली, सात वर्षाच्या विद्यार्थिनींनी पुष्पांजली सादरीकरण करून टाळ्यांची दाद मिळवली. पहिली ते तिसऱ्या वर्षांत शिकणाऱ्या विद्यार्थिनींनी विविध सादरीकरण केले, त्याचबरोबर अलारीपू ,गणेश कीर्तन, सरस्वती कौतुकम, शिव आणि पार्वती यांच्यावरील अभिनय पद,तिल्लाना आणि मंगलम असे पारंपारिक भरतनाट्यमच्या नृत्य रचना सादर केल्या. यावेळी मुलींनी सादर केलेले सर्वच नृत्याआविष्कार लक्षवेधी ठरले. एक ते सहा वर्षे पूर्ण केलेल्या निवडक विद्यार्थिनींचा मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. मॉरिशस महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष बलराज नारू यांनी तेजश्री आडीगे यांच्या कार्याचा विशेष कौतुक करीत मॉरिशसच्या राष्ट्रीय सांस्कृतिक कार्यक्रमासाठी नृत्यकला मंदिरच्या विद्यार्थ्यांना निमंत्रण दिलं. अभिनेत्री अश्विनी मुकादम यांनी पालकांचे विशेष कौतुक करून अभ्यासाबरोबर नृत्य कला जतन करावे, असा सल्ला दिला. भारत -मॉरिशस आंतरराष्ट्रीय कल्चरल कमिशनर संदीप जोशी यांनी तीस वर्षे सातत्याने नृत्य कला मंदिराचे कार्य देशात- विदेशात गाजत आहे. नृत्यकला मंदिराने भविष्यात होणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी व्हावे,असे आवाहन केले.

# सूर्यदत्त जीवनगौरव व राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा

- सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश उदय लळित यांच्या हस्ते शनिवारी होणार वितरण
- पद्मश्री प. पू. डॉ. चंदनाजी महाराज यांना 'सूर्यदत्त ग्लोबल पीस गांधीयन फिलॉसॉफी अवॉर्ड २०२६'

पुणे (दै. संध्या)

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या २८ व्या वर्धापनदिनानिमित्त देण्यात येणारे 'सूर्यदत्त जीवनगौरव पुरस्कार' व सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' घोषित करण्यात आले आहेत. येत्या शनिवारी (दि. ७) सायंकाळी ५.३० वाजता बंटारा भवन, बाणेर, मुंबई-पुणे महामार्ग येथे हे पुरस्कार सन्मानपूर्वक वितरित केले जाणार आहेत, अशी माहिती 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी 'सूर्यदत्त'च्या सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षित कुशल, मुख्य विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया, जनसंपर्क व्यवस्थापिका स्वप्नाली कोगजे, सल्लागार समिती सदस्य जीवराज चोले आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "अहिंसा विश्वभारतीचे संस्थापक आचार्य डॉ. लोकेश मुनीजी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश उदय लळित यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पार्टीचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष श्याम




जाजू, एअरमार्शल (निवृत्त) भूषण गोखले, माजी केंद्रीय निवडणूक आयुक्त टी. एस. कृष्णमूर्ती, ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद, एमआयटीचे अधिष्ठाता प्रा. डॉ. शरदचंद्र दराडे आदी उपस्थित राहणार आहेत."

पद्मश्री परमपूज्य आचार्य डॉ. चंदनाजी महाराज (ताई माँ) यांना 'सूर्यदत्त ग्लोबल पीस गांधीयन फिलॉसॉफी अवॉर्ड २०२६' हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. 'सूर्यदत्त जीवनगौरव पुरस्कार' यंदा माजी सरन्यायाधीश उदय लळित, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, हास्ययोग चळवळीचे विठ्ठल काटे, माजी सनदी अधिकारी शेखर गायकवाड, अभिनेते राकेश बेदी, बांधकाम व्यावसायिक विलासकुमार पालरेषा, दिग्दर्शक सुभाष सेहगल, शिक्षणतज्ज्ञ अशोककुमार ठाकूर, शास्त्रज्ञ डॉ. आनंद भाडळकर, विधिज्ञ ॲड. प्रमोद आडकर, साहित्यिका प्रा. सुरेखा कटारिया, उद्योजक प्रकाश गांधी, जागतिक रणनीतीकर संजय पुरी यांना 'सूर्यदत्त जीवनगौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे महेश सूर्यवंशी, योगसद्गुरू डॉ. कृष्णदेव गिरी, अभिनेत्री व स्टँडअप कॉमेडियन उपासना सिंग, भारतीय बुद्धिबळपटू ग्रँडमास्टर अभिजित कुंटे, सर्वोच्च न्यायालयातील वकील ॲड. आशुतोष श्रीवास्तव, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुरेंद्रा कुमारी, योग प्रशिक्षक राखी गुगळे, अवकाशशास्त्रज्ञ डॉ. कनक सहा, बासरीवादक पारस नाथ, ग्लोबल युथ ॲंबेसेडर दारासिंग खुराणा, डॉ. प्रमोद त्रिपाठी, गिर्यारोहक आशिष माने यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार', तर सीए मोहित धांड, गायिका प्रीती दवे व पिंकी दवे, जलतरणपटू हातवी शहा यांना 'सूर्यदत्त नॅशनल यंग अचिव्हर अवॉर्ड', तर मास्टर ऋषी शिव प्रसन्न आणि मास्टर राघव मालपाणी यांना 'सूर्यदत्त लिट्‌ल मास्टर नॅशनल अवॉर्ड' देण्यात येणार आहे.

## अनैतिक संबंधातून तरुणाचा खून करणाऱ्या दोघांना अटक

चाकण (दै. संध्या)

अनैतिक संबंधातून पंचवीस वर्षीय तरुणाचा घातक हत्याराने चेहरा ठेचून बिरदवडी (ता. खेड) येथे बुधवारी (दि.७ जानेवारी ) खून करणाऱ्या दोघांना चाकण पोलिसांनी मंगळवारी (दि.३) मोठ्या शिताफीने अटक केली.

मुंजा धोंडीबा नरहिरे (वय - २५, रा. गंगाखेड, जि. परभणी ) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. मुंजा याच्या खून प्रकरणी चाकण पोलिसांनी निखिल नानासाहेब चव्हाण (वय - २१, रा. खराबवाडी, ता. खेड, मूळ रा. काथनेश्वर, पो. धसाडी, ता. गंगाखेड, जि. परभणी) व स्वप्निल नरहरी पारधी (वय - १९, रा. खराबवाडी, ता. खेड, मूळ रा. ढोकी, जि. नांदेड) यांना अटक केली आहे. अधिक माहिती अशी की, मयत मुंजा याचे आरोपी निखिल याची आई



बिरदवडी येथे घडला होता प्रकार

उषा नानासाहेब चव्हाण (वय - ४०, रा. गंगाखेड, जि. परभणी) हिचे बरोबर अनैतिक संबंध होते. तरी देखील मुंजा हा तिला त्रास देत होता. त्यामुळे आरोपी स्वप्निल व निखिल यांनी मुंजा यास बिरदवडी गावच्या हद्दीतील स्मशानभूमीच्या मागील ओढ्या लगत ७ जानेवारीला निर्मनुष्य ठिकाणी नेऊन दारू पाजून खून केला. मयताची ओळख पटू नये म्हणून आरोपींनी मुंजा याच्या डोक्यात दगड घालून चेहरा विद्रुप केला व त्यानंतर दोघे आरोपी गायब झाले होते. पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे या खुनाला वाचा फोडून दोन आरोपींना बेड्या ठोकल्या. चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम व गुन्हे विभागाचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चंद्रशेखर मोरखंडे, सुनील शिंदे, भैरोबा यादव, प्रीतम ढमढेरे, योगेश कोळेकर, शिवाजी लोखंडे, महेश कोळी, शरद खैरनार, सुमित जगझाप आदींनी हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी परिश्रम घेतले.

## 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाच्या तनू भानची ऐतिहासिक कामगिरी!



पुणे (दै. संध्या)

पुणे येथील एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय छात्र सेनेची (एनसीसी) कॅडेट, कनिष्ठ अंडर ऑफिसर (जेएनओ) तनू भान हिने नुकत्याच नवी दिल्ली येथे झालेल्या प्रतिष्ठित एनसीसी प्रजासत्ताक दिन कॅम्पमध्ये (आरडीसी) ३६ महाराष्ट्र बटालियनचे प्रतिनिधित्व करत भारतातील सर्वोत्तम कॅडेट होण्याचा बहुमान पटकावत ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल तिला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले.

## बारामती दूध संघ व माळेगाव नगरपंचायत प्रशासकीय इमारतीचे नामांतर

माळेगाव (दै. संध्या)

बारामती दूध संघ व माळेगाव नगरपंचायतीच्या विकासामध्ये दिवंगत उपमुख्यमंत्री लोकनेते अजितदादा पवार यांचे योगदान मोलाचे राहिले आहे. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली या संस्थांनी सातत्याने प्रगतीची घोडदौड सुरू ठेवली. त्यांच्या कार्याची व स्मृतीची जपणूक व्हावी, या उद्देशाने बारामती दूध संघ व माळेगाव नगरपंचायतीच्या प्रशासकीय इमारतीचे आज नामांतर करण्यात आले. याशिवाय माळेगाव सहकारी साखर कारखान्याचेही नामांतर करण्याबाबत संचालक मंडळाची चर्चा सुरू आहे, अशी माहिती संचालक योगेश जगताप यांनी दिली. बारामती दूध संघाच्या आज झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत संघाचे नाव बदलून "सहकारमहर्षी अजितदादा पवार सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, बारामती" असे ठेवण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. याबाबतची माहिती संघाचे अध्यक्ष संजय रामचंद्र कोकरे व उपाध्यक्ष दत्तात्रय सदाशिव वावगे यांनी दिली. या बैठकीस संघाचे संचालकासह व्यवस्थापकीय संचालक डॉ. योगेश राणे, उपमहाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अमोल चव्हाण यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अजितदादांच्या सहकार क्षेत्रातील योगदानामुळेच बारामती दूध संघ राज्यात आदर्श ठरल्याचे यावेळी कोकरे यांनी सांगितले. दरम्यान, माळेगाव बुद्रुक नगरपंचायतीच्या नव्याने उभारल्या जात असलेल्या प्रशासकीय इमारतीस "लोकनेते अजितदादा पवार प्रशासकीय इमारत, माळेगाव बुद्रुक" असे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणा नगराध्यक्ष सुयोग सातपुते व उपनगराध्यक्षा वृषाली तावरे यांनी केली.

## क्रीडा संघटनांनी ब्लॉकचेन प्रणालीवर विहीत मुदतीत माहिती अपलोड करावी

पुणे (दै. संध्या)

गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवेतील ५ टक्के आरक्षणाचा लाभ पारदर्शक व जलद आणी त्रुटीमुक्त पद्धतीने मिळावा ब्लॉकचेन व कृत्रीम बुद्धीमत्ता अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ८ जानेवारी २०२६ रोजीच्या शासन निर्णयाने मान्यता देण्यात आली आहे.

ब्लॉकचेन व कृत्रीम बुद्धीमत्ता या प्रणालीचा लाभ तळागाळातील खेळाडूपर्यंत पोहोचण्यासाठी शासन निर्णयातील निर्देशाप्रमाणे प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. याद्दष्टीन पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी. क्रीडा संघटनेने करावयची कार्यवाही: राज्य व राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या सर्व अधिकृत एकविध क्रीडा संघटनांनी अभिलेख जतनाकरिता स्पर्धा संपल्यानंतर ७ दिवसांच्या आत स्पर्धेचा अंतिम निकाल, सहभागी खेळाडूंची



यादी आणी गुणपत्रिका विहित नमुन्यात "xlsx " फाईल "क्रीडा ई प्रमाण" प्रणालीवर (https://sports.maharashtra.gov.in/) वर अपलोड करण्यासाठी संचालनालयास सादर करणे क्रीडा संघटनावर बंधनकारक आहे. ही माहिती संबधीत संघटनेच्या अधिकृत पदाधिकाऱ्यांने डीजीटल स्वाक्षरीने प्रमाणित करणे आवश्यक आहे. विहित मुदतीत माहिती 'ब्लॉक चेन'वर अपलोड न करणाऱ्या संघटना स्मार्ट कॉन्टॅक्टद्वारे स्वंयचलीतरित्या डिफॉल्टर यादीत समाविष्ट करण्यात येणार आहे. अशा परिस्थितीत खेळाडूंचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या संघटनेची राहील.

खेळाडूच्या नोंदणी प्रक्रियेकरिता विशेष मोहीम: खेळाडूंनी आपल्या 'क्रीडा ई प्रमाण'" प्रणालीवर (https://sports.maharashtra.gov.in/) आपल्या आधार संलग्न आयडीद्वारे लॉगीन करुन नोंदणी करणे अनिवार्य आहे. खेळाडूंनी सादर केलेली माहिती आणी संघटनेने ब्लॉकचेनवर अपलोड केलेला, हॅश यांची प्रणालीद्वारे स्वंयचलीत पडताळणी होणार आहे. त्यामुळे खेळाडूंना यापुढे पडताळणीसाठी प्रत्यक्ष विभागीय कार्यालयात येण्याची किंवा कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. अपिलीय तरतूद: तांत्रिक कारणास्तव एखाद्या खेळाडूचे प्रमाणपत्र नांमजूर झाल्यास तक्रार करण्याची व तक्रारी नंतरही खेळाडूस प्रमाणपत्र न मिळाल्यास ३० दिवसांच्या आत ऑनलाईनपद्धतीने अपील करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. शासन निर्णयान्वये जुनी कागदपत्रावर आधारीत पडताळणी प्रक्रिया बंद करुन पुर्णत: डिजीटल क्रीडा ई प्रमाणपत्र प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे. खेळाडूंना ५ टक्के आरक्षणाच्या लाभ मिळण्याच्याद्दष्टीने क्रीडा संघटनांनी ब्लॉकचेनवर विहीत मुदतीत माहिती अपलोड करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.

# 'यूपीआय'चा वापर जगभर वाढतोय; सुरक्षा व नियंत्रणाचे काय?

**खासदार मेधा कुलकर्णी यांनी वेधले लक्ष; सुरक्षा व तांत्रिक उपायांना प्राधान्य देत असल्याचे अर्थमंत्र्यांचे उत्तर**

पुणे (दै. संध्या)

भारताच्या डिजिटल व्यवहार क्षेत्रातील युनिफाइड पेमेंट्स इंटरफेसचा (युपीआय) जगभर विस्तार होत आहे. ही 'युपीआय' प्रणाली आठ देशांमध्ये कार्यान्वित किंवा स्थानिक पेमेंट प्रणालींशी संलग्न आहे. मात्र, 'युपीआय'च्या आंतरराष्ट्रीय विस्तारात येणाऱ्या नियामक, तांत्रिक व सुरक्षेशी संबंधित अडचणींकडे खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी राज्यसभेत तारांकित प्रश्नाद्वारे लक्ष वेधले.

राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात तारांकित प्रश्न उपस्थित करताना प्रा. डॉ. कुलकर्णी यांनी यूपीआय कोणकोणत्या देशांमध्ये कार्यरत आहे, आंतरराष्ट्रीय जोडणीद्वारे




झालेल्या व्यवहारांची संख्या व मूल्य, तसेच भारतीय प्रवासी आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने पुढील विस्ताराचा आराखडा काय आहे, याची माहिती सरकारकडून मागितली.

यावर लेखी उत्तर देताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यूपीआय सध्या भूतान, फ्रान्स, मॉरिशस, नेपाळ, कतार, सिंगापूर, श्रीलंका आणि संयुक्त अरब अमिराती (युएई) येथे कार्यरत असल्याचे सांगितले. गेल्या तीन आर्थिक वर्षांत आंतरराष्ट्रीय यूपीआय व्यवहारांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, २०२३-२४ मध्ये ३७,०६० व्यवहारांवरून २०२५-२६ (डिसेंबर २०२५ अखेर) १४.८६ लाखांहून अधिक व्यवहार झाले आहेत. व्यवहार मूल्य १,९७० लाख रुपयांवरून ३३,०४३ लाख रुपये इतके वाढले आहेत, असे नमूद केले.

पुरवणी प्रश्नांद्वारे प्रा. डॉ. कुलकर्णी यांनी यूपीआयला इतर देशांच्या पेमेंट प्रणालींशी जोडताना येणाऱ्या नियामक, तांत्रिक व द्विपक्षीय समन्वयाच्या अडचणी, तसेच त्याचा अंमलबजावणीच्या कालावधीवर व व्याप्तीवर होणारा परिणाम स्पष्ट करण्याची मागणी केली. याशिवाय डेटा लोकलायझेशन, सायबर सुरक्षा, मनी लॉन्डरिंग व दहशतवाद वित्तपुरवठा प्रतिबंध नियमांचे पालन आणि सेटलमेंट जोखीम यांसारख्या मुद्द्यांवर यजमान देशांच्या नियामकांनी व्यक्त केलेल्या चिंतेबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केला.

त्यावर उत्तर देताना अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी यूपीआयचा जागतिक विस्तार करण्याची जबाबदारी नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या (एनपीसीआय), एनपीसीआय इंटरनॅशनल पेमेंट्स लिमिटेड या उपकंपनीकडे असल्याचे सांगितले. विविध देशांमधील तांत्रिक पायाभूत सुविधा, चलन विनिमय व्यवस्था, पेमेंट स्कीम्सचे मालकी हक्क आणि वेगवेगळ्या नियामक चौकटी यांमुळे आव्हाने निर्माण होत आहेत. मात्र, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि भागीदार देशांच्या समन्वयाने या अडचणी, तांत्रिक उपाय व द्विपक्षीय सहकार्याच्या माध्यमातून दूर करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या सर्व अडचणी असूनही यूपीआय आठ देशांमध्ये यशस्वीपणे कार्यरत असल्याने भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांवर जागतिक स्तरावर विश्वास निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. परदेशात यूपीआयचा वाढता स्वीकार भारतीय प्रवाशांसाठी व्यवहार सुलभ करत असून, डिजिटल पेमेंट क्षेत्रात भारताची जागतिक नेतृत्वाची भूमिका अधिक मजबूत करत आहे. सरकारने भविष्यातही यूपीआयचा आंतरराष्ट्रीय विस्तार वाढवून सुरक्षित, जलद व परवडणाऱ्या सीमापार डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्याची कटिबद्धता व्यक्त केली.